लातूर

# भूकंप

LATUR BHUKAMP

संपादक: अशोक चिंचोले

सांज दैनिक : सोमवार - २५ सप्टेंबर २०२३

वर्ष - ३७ वे

अंक - १७१

पाने - ४

किंमत २ रूपये

E-Mail : dailybhukamp@gmail.com

RNI No. MAHMAR/2012/42770

☎ : -9422072823,251822

epaper.dainikbhukamp.com



लातूर - नाशिक

दररोज

रात्री ८.३० वाजता

GET IT ON Google Play

VISHWA TRAVELS APP

विश्व ट्रॅव्हल्स

२, उद्योग भवन कॉम्प्लेक्स, शिवाजीनगर, लातूर.

संपर्क : (02382) 242790, 254002, 249329, 88888 45403, 88888 45404.

Online Booking : www.vishwatravels.in


## संपादकीय......

### लोकप्रतिनिधींना काहीच कसे वाटत नाही

सरकार आणि लोकप्रतिनिधी हळू-हळू करून आपआपल्या जबाबदाऱ्या विसरून चालले आहेत का? असा प्रश्न पडतो आहे. विशेष करून लातूर जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी तर आपल्या जबाबदाऱ्या आणि दिलेला शब्द विसरून चाललेत असे वाटत आहे. मे २०२२ मध्ये आ. संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी लातुरात एक मोर्चा काढून लातूर येथे उभारण्यात आलेल्या 'सुपरस्पेशालिटी' हॉस्पीटलचे खासगीकरण होऊ देणार नाही अशी हमी दिली होती. लातूरचे आ. अमित देशमुख वैद्यकीय शिक्षणमंत्री होते. त्यांच्याच विधानसभा मतदार संघाच्या शहरात म्हणजेच लातुरात सुपर स्पेशालिटी हॉस्पीटलची अत्यंत सुसज्ज अशी इमारत उभी आहे. त्या ठिकाणी अत्याधुनिक अशा मशिनरी धूळखात पडून आहेत. याच महिन्यात १६ सप्टेबर रोजी राज्याचे विद्यमान वैद्यकीय शिक्षणमंत्री ना. हसन मुश्रीफ हे लातूरला येऊन गेले. त्यांनी विलासवराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय 'खासगी'ना चालवायला देण्याचा विचार नाही असे म्हटले होते आणि हा महिना संपण्याच्या अगोदरच छत्रपती संभाजी नगर लातूर येथील सुपर स्पेशालिटी हॉस्पीटल खासगींना देण्याचा शासनाचा निर्णय झाला आहे. हा लातूर व अवती भवतीच्या रूग्ण व त्यांच्या नातेवाईकांना पर्यायाने लातूरकरांसाठी गंभीर आजारावरील उपचार नाकारणारा आहे. अशात आमच्याही जिल्ह्यात गंभीर आजाराचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. पैसेवाले लोक पैसा देऊन महागडा उपचार कोठेही जाऊन घेतात, घेऊ शकतात. पण लातूरचे सुपर स्पेशालिटी हॉस्पीटलचे विद्यमान सरकारने खासगीकरण करून सामान्य, गरीब, मध्यमवर्गीय रूग्णांना मृत्यूच्या दाढेत नेऊन कोंबण्याचा प्रकार केला आहे. प्रधानमंत्री स्वास्थ्य सुरक्षा योजना या केंद्र सरकारच्या योजनेतून १५० कोटी रूपयांहून अधिक पैसा खर्च करून लातूरला सुपर स्पेशालिटी हॉस्पीटल उभारण्यात आले आहे. यात ८०% निधी केंद्र सरकारचा व २०% निधी राज्य सरकारचा आहे. या योजनेतून सुपर स्पेशालिटी हॉस्पीटल उभारले आहे. केवळ ईमारत उभारली असे नव्हे तर इथे आज घडीस हृदय, किडनी, मेंदूशी संबंधीत आज, डायलेसीस, न्यूरो आजारासाठीच्या अत्याधुनिक अशा मशिनरी दोन वर्षांपासून धूळ खात पडून आहेत. ह्या सर्व मशिनरी अत्याधुनिक अशा आहेत. सूसज्ज इमारत अद्ययावत मशिनरीसह हे सूपर स्पेशालिटी हॉस्पीटल १५ वर्षांसाठी खासगींना चालविण्यास देत आहे. इमारत आहे, मशिनरी आहे तर सरकारी म्हणून का चाविले जात नाही याची चौकशी करता हे चालवायला लागणारे तज्ञ डॉक्टर, सुपर स्पेशालिटी म्हणून लागणारे तज्ञ, टेक्नीशियन, तंत्रज्ञ, स्टाफ नाही. सरकार या विभागात नोकर भरतीच करायची नाही आणि सरकार जनतेला तर तुम्ही आजारी पडा, सर्व बाळांतपण फुकटात आम्ही करू अशी घोषणाबाजी करायला मागे पुढे पाहत नाही. सरकार नोकरभरती करू शकत नाही. म्हणजे सरकार, सरकार चालविण्यासाठी 'ना' लायक ठरत आहे. हे सरकार आपल्या राज्यातील एक-एक विभाग तुकडा तोडून द्यावा तसे 'खासगी'च्या घशात टाकत आहे. आता हे सरकार असेही सांगेल कि ज्या एजन्सी, डॉक्टरांना हे सुपर स्पेशालिटी हॉस्पीटल चालविण्यास दिले आहे. ते गरिबांना पैसे घेणार नाहीत. सवलतीत उपचार करतील, असे सांगितले पण चालवायला घेणारे जे कोणी कंत्राटदार डॉक्टर आहेत ते 'धर्मादाय' भावनेतून हॉस्पीटल चालविणार नाहीत. याच खासगी डॉक्टरांपैकी काहीचे हॉस्पीटल धर्मादायकडे नोंदलेले आहेत. ते आपल्या खासगी हॉस्पीटलमध्ये धर्मादाय सेवा देत नाहीत. तर चालवायला घेतलेले हॉस्पीटल सेवाभावी वृत्तीतून चालविणारच नाहीत. खासगी डॉक्टरांना धर्मादाय भावनेतून सेवा म्हणूर सुपर स्पेशालिटी हॉस्पीटल चालवायला घेण्याची गरजच नाही. ते आपल्या खासगी रूग्णालयात आठवड्यातून दोन वेळा गरजूंवर मोफत, माफक दरात सेवा देऊ शकतात. एखाद्या रूग्णालयात रूग्णाला दाखल करायचे झाल्यास 'कत्तलखाण्यात' त्याला नेतोय अशी भिती बाळगतात (अर्थात खासगी हॉस्पीटलला आम्ही कत्तलखान्याची उपमा देणार नाही). खासगी रूग्णालय, तिथे केले जाणारे उपचार, पैसे दऊन 'मुडदा' कपड्यात गुंडाळून घरी आणणे हाच अनुभव बहुतेकजण सांगतात. माय-बाप सरकारने नोकरी, शिक्षण याप्रमाणे आरोग्याचं अशा पद्धतीने खासगीकरण करून मरण तरी महाग आणि त्रासदायक करू नये. निवडणुकीत मतं घेताना कसे सराईताप्रमाणे गोड-मधाळ बोलून मतं घेता आणि प्रत्यक्ष सरकार चालविताना का तुम्ही लकवा मारल्यासारखे वागता हेच कळत नाही. यात असेही नाही कि विशिष्ट एक युती-आघाडीच जबाबदार आहे. सत्तेवर आलेल्या प्रत्येकाची चाल हि सामान्यांचा छळ अशीच राहिली आहे. लातूर बरोबर छत्रपती संभाजीनगर येथील सूपर स्पेशालिटी हॉस्पीटल खासगीस देण्याचा निर्णय झाला आहे. हे कळताच तेथील लोकप्रतिनिधींनी या निर्णयास तीव्र विरोध दर्शविला आहे. त्यास लातूर अपवाद ठरत आहे. प्रत्येक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय स्तरावर अभ्यागत समिती असते. तेथील आमदार त्या समितीचे अध्यक्ष असतात, लातूरच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या अभ्यागत समितीचे अध्यक्ष आ. अमित देशमुख आहेत. पदसिद्धपद असल्याने त्यांनी त्या पदावर असण्यासाठी आमचा आक्षेप नाही. तसे ते वैद्यकीय शिक्षणमंत्री होते. पण ते येथील नोकर भरती करू शकले नाहीत कि अभ्यागत समितीचे अध्यक्ष म्हणून त्यांनी गेल्या ४ वर्षात एकही बैठक घेतली नाही. आज जिल्हा व शेजारचे रूग्ण मोठ्या प्रमाणात लातुरात येतात, त्यांनी लातूरचे सुपर स्पेशालिटी हॉस्पीटल आधार वाटत होते. शासकीय व मोफत उपचार अशा घोषणा करित असले तरी आम्हाला उपचार परवडत नाहीत. खासगीत दाखल व्हायचे म्हणजे 'भिक नको पण....आवर' अशी जनतेची अवस्था होते. विद्यमान सरकारने लातूरचे सोयाबीन संशोधन केंद्र, देवणी गोवंशी संशोधन केंद्र इतरत्र पळविले, याहीपेक्षा लातूरच्या सूपर स्पेशालीटी हॉस्पीटल खासगीस चालवायला देणे. आमच्या जीवन मरणाचा प्रश्न ठरणार आहे. एकत्रीत उस्मानाबाद जिल्ह्यात असताना लातूरकरांना साध्या 'एस. टी. डिव्हीजन'साठी आंदोलन केले. दोघेजण हुतात्मा ठरले, गोळीबार झाला, लातूर चळवळीचे शहर थोडे काही चुकीचे झाले म्हटले कि आंदोलन करणारा जिल्हा म्हणून ओळखले जायचे. आज सरकारी उद्योगाचे खासगीकरण, शिक्षणाचे खासगीकरण, वैद्यकीय हॉस्पिटलचे खासगीकरण होत आहे. आमचा तरूण शांत आहे. लोकप्रतिनिधींना लाज कशी वाटत नाही असे आम्ही म्हणणार नाही. पण त्यांना काहीच कसे वाटत नाही हा प्रश्न लातूरकर म्हणून सतावतो आहे.

# लातूरच्या पाणी प्रश्नाने झाला दोन आमदारात 'क' चा 'ग'



लातूर : एका जिल्ह्यातील एका पक्षातील असले तरी जिल्ह्यातील भाजपा आमदार माजी मंत्री संभाजीराव पाटील निलंगेकर आणि आ. अभिमन्यू पवार यांच्यात पाणी समस्यानंतर 'क' चा 'ग' झाल्याचे चित्र परवा औसा येथे पाहायला मिळाले.

माजी मंत्री आ. संभाजीराव पाटील यांनी लातूर जिल्ह्याच्या हक्काच्या पाण्यासंदर्भात संपूर्ण जिल्हाभरात चांगला प्रतिसाद मिळाला. त्यांची ही रॅली औसा येथे आली. पण औशाचे आमदार अभिमन्यू पवार व आ. संभाजीराव पाटील निलंगेकर हे एकाच पक्षाचे असले तरी त्यांच्या दोघात 'कट्टी' असल्याचे जाणवत होते. एवढेच नव्हे तर निलंगा कृषी उत्पन्न बाजार समिती निवडणुकीत आ. अभिमन्यू पवार यांनी आपल्याच पक्षाच्या आमदाराच्या विरोधात स्वतंत्र पॅनल टाकले होते. आ. निलंगेकर यांच्या नेतृत्वातील जलसाक्षरता रॅली औशात आली. दोन्ही आमदार एका मंचावर आले. तिथे दोन्ही आमदारांचे समर्थक मोठ्या संख्येने होते. यावेळी दोन्ही आमदारांची भाषणे झाली. अशात दोघांनीही एकमेकांविषयी कधी कौतुक केले नाहीत. एवढे कौतुक केलं. आ. संभाजीराव पाटील यांनी आ. पवारांनी आपल्या मतदार संघात शेत रस्त्यासंदर्भात कोणी केलं नाही असं आदर्श काम केल्याबद्दल जाहीर कौतूक केलं. तर आ. अभिमन्यू पवार यांनी संभाजीरावांनी जिल्ह्याच्या पाण्यासारख्या महत्वाच्या समस्येवर जलसाक्षरता रॅली काढली आहे. असं काम कोणी केलं नाही, त्यांच्या या मोहिमेत मी आ. संभाजीभैय्यासोबत शेवटपर्यंत राहीन अशी हमी दिली. एकूणच आ. संभाजीराव पाटील निलंगेकर व आ. अभिमन्यू पवार यांच्यात आतापर्यंत असलेली 'कट्टी' विसरून गट्टी जमली, या दोघात 'क' चा 'ग' झाल्याबद्दल कार्यकर्ते (सर्वच नाही) समाधान व्यक्त करित होते.

## गोळी झाडून घेतलेल्या पोलीस कर्मचारी पिटले यांचा मृत्यू

लातूर : लातूरच्या गांधी चौक पोलीस ठाण्याच्या लॉकऑप येथे ड्युटीवर असणारे पोलीस हवालदार पांडुरंग शंकरराव पिटले (वय ४९) यांनी दि. २२ सप्टेंबर शुक्रवार रोजी रात्री शासकीय एसएलआर या बंदुकीतून गोळी झाडून घेतली होती त्यांचेवर लातूरच्या खाजगी रुग्णालयात उपचार चालू असताना आज सोमवार रोजी सकाळी त्यास मृत घोषित करण्यात आले.

पांडुरंग शंकरराव पिटले हे गेली काही दिवसापासून गांधी चौक येथील लॉकऑप गार्ड म्हणून कर्तव्यावर होते.शुक्रवारी रात्री त्यांनी स्वतः डोक्यात गोळी झाडून घेतली होती.गोळी डोक्यातून आरपार गेली होती, असे असतानाही त्यांचेवर लातूरच्या शासकीय लातूरच्या खाजगी रुग्णालयात उपचार करण्यात येत होते,मात्र आज शुक्रवार रोजी सकाळी त्यांना मृत घोषित करण्यात आले. पांडुरंग पिटले हे विवेकानंद पोलीस ठाण्यात कर्तव्यावर होते.विवेकानंद पोलिस ठाण्यात लॉकऑप नसल्याने तेथील कैदी गांधी चौक लॉकऑप मध्ये ठेवण्यात येत होते, तेथेच पिटले हे कर्तव्यावर असताना त्यांनी शुक्रवारी रात्री दहा वाजण्याच्या सुमारास बंदुकीतून गोळी झाडून घेतली होती . या प्रकरणी गांधी चौक पोलीस ठाण्यात आकस्मित मृत्यू म्हणून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## आरक्षण प्रश्नी धनगर समाज कार्यकर्त्यांचे मुंडन आंदोलन

लातूर : धनगर समाजाच्या एसटी (अनुसूचित जमाती) या निर्णयाची अंमलबजावणी करण्यात यावी या मागणीसाठी सकल धनगर समाजाच्या वतीने २७ सप्टेंबर बुधवार रोजी सकाळी अकरा वाजता पु.अहिल्यादेवी होळकर चौक लातूर येथे मुंडन आंदोलन करण्यात येणार आहे.

धनगर आरक्षण प्रश्नी राज्यभरातील धनगर समाज बांधव आक्रमक बनले आहेत. वेगवेगळ्या जिल्ह्यामध्ये वेगवेगळ्या पद्धतीने आंदोलन चालू आहेत. लातूर येथे देखील धनगर समाजाच्या वतीने काही दिवसापूर्वी रस्त्यावर शेळ्या मेंढ्या आणून रास्ता रोको आंदोलन केले होते. बुधवार २७ सप्टेंबर रोजी सकाळी अकरा वाजता धनगर समाजातील अनेक तरुण, शासनाने धनगर समाजाच्या एसटी निर्णयाची अंमलबजावणी करावी या मागणीसाठी मुंडन करणार आहेत. मुंडन केलेले कार्यकर्ते व इतर कार्यकर्ते हे छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे येऊन तिथून जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत मोर्चा ने जाणार आहेत जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ते आपल्या आंदोलनाचा समारोप करण्यात येणार असल्याचे सकल धनगर समाजाच्या वतीने प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.



### उदगिरात मानाच्या आजोबा गणपतीची आरती करून श्री विसर्जनास प्रारंभ

उदगीर येथील सार्वजनीक गणेश मंडळाच्या गणेश मुर्तीचे आज विसर्जन असते. शहरातील मानाचा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पारकट्टी गल्लीतील आजोबा गणपतीची आरती क्रीडा मंत्री ना. संजय बनसोडे, जिल्हाधिकारी सौ. वर्षा ठाकूर-घुगे, पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटुरे, सहाय्यक पोलीस अधीक्षक निकेतन कदम, प्रा. मल्लू झुंगास्वामी, मंडळाचे अध्यक्ष बबलू मुळे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे, संग्राम हुडे, उत्तरा कलबुर्गे आदिंच्या हस्ते करण्यात येवून श्री विसर्जन मिरवणुकीस प्रारंभ करण्यात आला.

## लातूर जिल्ह्यात यलो अलर्ट

मुंबई : लातूर जिल्ह्यात हवामान खात्याने सलग चार दिवस यलो अलर्ट घोषीत केला आहे.

गेल्या काही दिवसात लातूर व व शेजारील जिल्ह्यावर केवळ ढग भरून आलेले दिसत होते. जिल्ह्यात तुरळक काही ठिकाणी पाऊस पडत होता. मात्र, आज हवामान विभागाने लातूर जिल्ह्यामध्ये २५, २६, २७ व २८ असे चार दिवस यलो अलर्ट जारी केला आहे. या दरम्यान वीजा कडाडने, वादळ, वारा याचीही शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

## सुनेचा खून पतीसह दीर, जाऊ, सासू-सासऱ्याविरूद्ध गुन्हा

चाकूर : सुनेचा संशयावरून खून केल्याप्रकरणी पतीसह दीर, जाऊ, सासू-सासरा अशा पाच जणांविरूद्ध खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. स्वाती गोविंद केदार (वय ३३) रा. राजेवाडी, ता. चाकूर हिचा पती गोविंद केदार, दीर विष्णू केदार, जाऊ सुमन केदार, सासरा जगन्नाथ केदार, सासू कमलाबाई केदार यांच्या विरूद्ध अंगद दादाराव गुट्टे रा. कासारवाडी, ता. परळी यांच्या फिर्यादीवरून चाकूर पोलिसांत खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## त्यांच्या मते....

▣ **आज माझ्याकडे अर्थ खातं आहे. त्यामुळे आपल्याला झुकते माप मिळते. पण यापुढे अर्थखाते टिकेल की नाही टिकेल, सांगता येत नाही.**

-उपमुख्यमंत्री अजित पवार

☛ नक्कीच तीन चाकी सरकारला आणखी एक चाक जुडणार असावं.

▣ **महाराष्ट्रात अनेक मोठ्या माणसांचा जन्म झाला. पण, आपल्याच लोकांना आपण मोठं करित नाही.**

-राज ठाकरे

☛ खेकड्यांचे अनुयायी अधिक असावेत.

▣ **माझ्या विरोधात भाजपा तीनदा लढली. यावेळी कोणीतरी लढणारच आहे.**

- खा. सुप्रिया सुळे

☛ कोणी तरी (घरातील) आपल्या विरोधात लढू नये ही रणनिती आखताय म्हणे.

▣ **एक रूपया जरी खाल्ला तर तुमचा जोडा आणि आमचं डोकं.**

- ना. गिरीश महाजन

☛ 'जोडा' आणि 'डोकं' चा शोध घ्यावा लागेल.

# हिसकावलेल्या २३ मोबाईलसह दोघांना अटक; साडेतीन लाखाचा ऐवज जप्त



लातूर : लातूर शहर व परिसरात वेगवेगळ्या ठिकाणाहून चालत जाणारे अथवा मोबाईल वर बोलत उभारलेले व्यक्तींच्या हातातील मोबाईल हिसकावून मोबाईलची चोरी करणाऱ्या दोघा जणांना स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलीस पथकाने एका मोटार सायकलसह अटक केली असून त्यांच्याकडून एकूण तीन लाख ४९ हजार रुपयाचा ऐवज जप्त केला आहे.

गेल्या काही दिवसात लातूर शहरातील विविध पोलीस ठाण्याचे हद्दीतून मोबाईल हिस्टवण्याचे प्रकार घडले होते याप्रकरणी एमआयडीसी पोलिसात दाखल करण्यात आलेल्या एका गुन्ह्याच्या संदर्भाने तपास चालू असताना स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलीस पथकाने लातूरच्या लातूर ते कळम रोडवर काही तरुण चोरी गेलेले मोबाईल स्वस्तात विकत असल्याची खबर मिळताच त्या ठिकाणी त्यांनी धाड टाकली यात स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाच्या पोलीस पथकाने श्याम उर्फ लाल्या सुरेश पवार राहणार तीन ऑइल मिल जवळ वरवंटी लातूर व ओम मोहन गायकवाड राहणार हरंगुळ खुर्द तालुका लातूर या दोघा तरुणांना ताब्यात घेतले त्यांची अधिक चौकशी करतात त्यांनी शहरातील विविध ठिकाणाहून चालत जाणाऱ्या अथवा बोलत उभे असलेल्या व्यक्तींच्या हातातील मोबाईल हिसकवल्याची कबूल केली त्यांनी आणि आपल्या अन्य एका साथीदारासह मोबाईल हिसकावल्याचे कबूल केले.त्यांचेकडून स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाच्या पोलीस पथकाने चोरीस गेलेले एकूण २३ मोबाईल व मोबाईल चोरीसाठी वापरण्यात आलेली एक मोटार सायकल असा ३ लाख ४९ हजार रुपयाचा ऐवज जप्त केला आहे. या बाबत थोडक्यात हकीकत अशी की, काही दिवसांपूर्वी अनोळखी आरोपींनी पोलीस ठाणे एमआयडीसी हद्दीत एकास अडवून जबरीने त्याच्याकडील मोबाईल हिसकावून घेऊन पळून जाण्याची घटना घडली होती. त्यावरून पोलीस ठाणे एमआयडीसी येथे ३९२, ३४ भादवि कलमाखाली गुन्हा दाखल करण्यात आला होता.

पोलीस अधीक्षक श्री. सोमय मुंडे यांनी सदर गुन्ह्यातील आरोपींना अटक करणे बाबत आदेशित करून सूचना केल्या होत्या. पोलीस अधीक्षक श्री.सोमय मुंडे,अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे, उपविभागीय पोलीस अधिकारी लातूर शहर भागवत फुंदे यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांचे नेतृत्वात पोलीस पथक तयार करण्यात आले. सदरची कामगिरी वरिष्ठांचे मार्गदर्शनात व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांचे नेतृत्वात पोलीस अंमलदार माधव बिलापट्टे, नवनाथ हासबे, मोहन सुरवसे, राजू मस्के, तुराब पठाण, जमीर शेख, संतोष खांडेकर यांनी केली आहे.


**CHANGE IN NAME**

I have change my name from **DEEPAK BABRUVAN SARVADE TO DEEPAK BABRUWAHAN SARWADE** Hence for this declaration in future.

**OLD NAME : DEEPAK BABRUVAN SARVADE**

**NEW NAME : DEEPAK BABRUWAHAN SARWADE**

In future the same name will be used by my spouse and children.

**Address :** At. Post. Katgaon, Tq. Dist. Latur, Maharashtra 413531

Aadhar No. 273814158494 Mobile No. 9527412763

**CHANGE IN NAME**

I have change my name from **SHARMILA DEEPAK SARVADE TO SHARMILA DEEPAK SARWADE** Hence for this declaration in future.

**OLD NAME : SHARMILA DEEPAK SARVADE**

**NEW NAME : SHARMILA DEEPAK SARWADE**

In future the same name will be used by my spouse and children.

**Address :** At. Post. Katgaon, Tq. Dist. Latur, Maharashtra 413531

Mobile No. 9527412763

**CHANGE IN NAME**

I have change my name from **BABRUVAN DAGADU SARVADE TO BABRUWAHAN DAGADU SARWADE** Hence for this declaration in future.

**OLD NAME : BABRUVAN DAGADU SARVADE**

**NEW NAME :BABRUWAHAN DAGADU SARWADE**

In future the same name will be used by my spouse and children.

**Address :** At. Post. Katgaon, Tq. Dist. Latur, Maharashtra 413531

Mobile No. 9527412763

**CHANGE IN NAME**

I have change my name from **RUPABAI BABRUVAN SARVADE TO RUPABAI BABRUWAHAN SARWADE** Hence for this declaration in future.

**OLD NAME : RUPABAI BABRUVAN SARVADE**

**NEW NAME : RUPABAI BABRUWAHAN SARWADE**

In future the same name will be used by my spouse and children.

**Address :** At. Post. Katgaon, Tq. Dist. Latur, Maharashtra 413531

Mobile No. 9527412763

# मोहिंदर अमरनाथ यांना करायची होती धोनीची हकालपट्टी, निवडकर्त्यांना म्हटले होते जोकर

२४ सप्टेंबर ही तारीख भारतीय क्रिकेटच्या इतिहासात खूप महत्त्वाची आहे. ही तारीख अशा घटनांशी संबंधित आहे, ज्यांचा भारत पहिल्यांदाच विश्र्वविजेता बनण्याशी खोलवर संबंध आहे. १६ वर्षांपूर्वी, २४ सप्टेंबर २००७ रोजी, जोहान्सबर्गच्या वंडरर्स मैदानावर भारताने पाकिस्तानचा अंतिम फेरीत पराभव केला आणि पहिला ढ२० विश्र्वचषक जिंकला. एमएस धोनीच्या नेतृत्वाखाली टीम इंडिया नव्या फॉरमॅटची पहिली चॅम्पियन बनली. पण केवळ



Image Credited - News18

टी-२० विश्र्वचषकच नाही, तर २४ सप्टेंबरला अनेक वर्षांपूर्वी एका खेळाडूचा जन्म झाला जो भारताच्या पहिल्या विजेतेपदाचा हिरो होता. नाव आहे- मोहिंदर अमरनाथ.

५ ऑक्टोबरपासून भारतात एकदिवसीय विश्र्वचषक २०२३ सुरू होत आहे आणि अशा परिस्थितीत ही स्पर्धा सध्या क्रिकेट विश्र्वात चर्चेचा विषय आहे. यासंबंधीचे विश्र्लेषण, चर्चा, वादविवाद, नोंदी आणि जुन्या गोष्टी चाहत्यांच्या आणि तज्ज्ञांच्या ओठावर आहेत. यामध्येही जेव्हा भारताविषयी बोलले जाते, तेव्हा १९८३ च्या विश्र्वचषकाचा नेहमीच उल्लेख होणे स्वाभाविक आहे, कारण तो विश्र्वचषक होता, जेव्हा भारताने संपूर्ण क्रिकेट जगताला चकित केले होते आणि विजेतेपद पटकावले होते. मोहिंदर अमरनाथच्या जबरदस्त कामगिरीने त्या विजेतेपदाची कहाणी लिहिली होती. आज मोहिंदर ७३ वर्षांचे झाले आहेत. 'जिमी' या नावाने प्रसिद्ध असलेल्या मोहिंदरच्या रक्तात क्रिकेट होते. त्यांचे वडील लाला अमरनाथ हे स्वतः एक महान भारतीय अष्टपैलू खेळाडू होते, ज्यांनी देशासाठी पहिले कसोटी शतक झळकावले. मोहिंदरचा भाऊ सुरिंदर अमरनाथ जास्त क्रिकेट खेळू शकला नाही, पण त्यानेही पदार्पणाच्या कसोटीत शतक झळकावले. जोपर्यंत मोहिंदरचा संबंध आहे, त्याच्यासाठी शब्द कमी पडतात, तो एक अद्भुत आणि लढाऊ खेळाडू होता. १९७० आणि १९८० च्या दशकात सुनील गावस्कर आणि दिलीप वेंगसरकर यांच्यासह भारतीय फलंदाजीचा तो प्राण होता.

मोहिंदरच्या कारकिर्दीतील सर्वात उज्ज्वल क्षण हा देखील भारतीय क्रिकेटमधील सर्वात संस्मरणीय क्षणांपैकी एक होता. २५ जून १९८३ रोजी लॉर्ड्सवर मोहिंदर अमरनाथने प्रथम आपल्या बॅटने आणि नंतर आपल्या गोलंदाजीने वेस्ट इंडिजला सलग तिसरे विजेतेपद जिंकण्यापासून रोखले. त्या फायनलमध्ये अमरनाथने वेस्ट इंडिजच्या घातक वेगवान आक्रमणाविरुद्ध २६ धावांची लढत खेळली. यानंतर त्याने वेस्ट इंडिजचे तीन विकेट घेत भारताला विजेतेपद मिळवून दिले. अमरनाथने मायकेल होल्डिंगला एलबीडब्ल्यू देऊन सामना संपवला आणि भारताला चॅम्पियन बनवले. तो त्या फायनलचा सामनावीर ठरला.

अमरनाथ हे केवळ लढाऊ क्रिकेटपटू नव्हते, तर निर्भयपणे आपले मत मांडणारेही होते. याची अनेक उदाहरणे त्याच्या क्रिकेट कारकिर्दीत आणि त्यानंतरही पाहायला मिळाली. १९७० च्या दशकात, जेव्हा त्याला कोणत्याही कारणाशिवाय सतत संघात आणि बाहेर फेकले जात होते, तेव्हा त्याने न घाबरता त्या काळातील निवडकर्त्यांना जोकरांचा समूह म्हणून वर्णन केले. इतकेच नाही, तर अनेक वर्षांनंतर अमरनाथ स्वत: निवडकर्ता बनल्यानंतरही कठोर निर्णय घेण्यास मागे हटले नाहीत. जरी प्रश्र्न विश्र्वचषक विजेत्या कर्णधार एमएस धोनीला काढून टाकण्याचा असेल. भारताने २०११-१२ मध्ये विश्र्वचषक नक्कीच जिंकला होता पण इंग्लंड आणि ऑस्ट्रेलियामध्ये सलग ८ कसोटी सामने गमावले होते. अशा स्थितीत त्यावेळी निवड समितीचा भाग असलेले अमरनाथ आणि इतर दोन निवडकर्ते धोनीला कर्णधारपदावरून हटवण्याच्या बाजूने होते आणि त्यांनी तसा प्रस्तावही ठेवला होता, पण बीसीसीआयचे तत्कालीन अध्यक्ष एन श्रीनिवासन यांनी त्यावर बंदी घातली होती. त्या काळातही धोनी श्रीनिवासन यांच्या कंपनीच्या मालकीच्या चेन्नई सुपर किंग्ज या आयपीएल संघाचा कर्णधार होता. या प्रस्तावानंतर काही वेळातच श्रीनिवासन यांना अचानक निवड समितीतून हटवण्यात आले. अमरनाथच्या कारकिर्दीबद्दल सांगायचे तर, माजी अनुभवी अष्टपैलू खेळाडूने आपल्या कारकिर्दीत ६९ कसोटी खेळल्या आणि ४३७८ धावा केल्या, ज्यात ११ शतके आणि २४ अर्धशतकांचा समावेश आहे. याशिवाय त्याच्या खात्यात ३२ विकेट्सही आल्या. ८५ एकदिवसीय सामन्यांमध्ये त्याने २ शतके आणि १३ अर्धशतकांच्या मदतीने १९२४ धावा केल्या, तसेच ४६ विकेट्सही घेतल्या.

# तुम्ही असे न केल्यास ७ दिवसांनी बंद होईल तुमचे डिमॅट खाते

शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करण्यासाठी डिमॅट खाते आवश्यक आहे. तुमचेही डिमॅट खाते असेल, तर ही बातमी तुमच्यासाठी उपयुक्त आहे. वास्तविक, बाजार नियामक डएइख नुसार डिमॅट खात्यात नामांकन दाखल करावे लागते. तुम्ही तुमच्या डिमॅट खात्यात अद्याप नामांकन दाखल केले नसेल, तर तुमचे खाते ७ दिवसांनंतर निष्क्रिय केले जाईल. शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करण्यासाठी डिमॅट खात्यात नामांकन अपडेट करण्याची अंतिम मुदत ३० सप्टेंबर २०२३ आहे. अशा परिस्थितीत तुमच्याकडे पुढच्या आठवड्यापर्यंतच वेळ शिल्लक आहे.

मार्केट रेग्युलेटर सेबीने याआधीही अनेक वेळा नॉमिनी जोडण्यासाठी मुदत दिली आहे. अशा परिस्थितीत, लोकांना आशा आहे की या वेळी पुन्हा सेबी मुदत वाढवू शकते. वास्तविक, यापूर्वी नामनिर्देशन दाखल करण्याची अंतिम मुदत ३१ मार्च २०२३ रोजी संपत होती, परंतु २७ मार्च रोजी सेबीने अधिसूचना जारी करून ही मुदत वाढवली होती. अपूर्ण नामांकनामुळे, सेबी असे खाते निष्क्रिय करेल आणि नामांकनाचे काम पूर्ण झाल्यानंतरच ते पुन्हा सक्रिय केले जाऊ शकते.

नामांकन दाखल न करता तुमचे खाते निष्क्रिय झाल्यास, तुम्ही अनेक गोष्टी करू शकणार नाही. तुम्ही तुमच्या डिमॅट खात्यात पैसे जमा करू शकणार नाही किंवा काढू शकणार नाही. अशा परिस्थितीत तुमचे खाते सक्रिय ठेवण्यासाठी तुम्ही हे काम ३० सप्टेंबरपूर्वी करावे. तुम्ही नॉमिनी कसे जोडू शकता ते आम्ही तुम्हाला सांगतो.

**असे नॉमिनी जोडा**

डिमॅट खात्यामध्ये नामांकनाचे काम पूर्ण करण्यासाठी, प्रथम डीमॅट खात्यात लॉग इन करा. आता प्रोफाइल विभागात चू छोळपशशी चा पर्याय निवडा. यानंतर Add Nominee किंवा opt-out चा पर्याय निवडा. आता नॉमिनीचे तपशील जोडा आणि नॉमिनीचा कोणताही आयडी पुरावा येथे अपलोड करा. यानंतर नॉमिनीची शेअर टक्केवारी निवडा. त्यानंतर दस्तऐवजावर ई-स्वाक्षरी करा आणि आधार ओटीपी प्रविष्ट करा. पडताळणी प्रक्रियेला २४ ते ४८ तास लागतील आणि त्यानंतर नामांकनाचे काम पूर्ण होईल.



Image Credited - IWMBuzz

# पाकिस्तान संघाला अद्याप मिळालेला नाही भारताचा व्हिसा: पीसीबीने रद्द केल्या वर्ल्ड कपशी संबंधित योजना

विश्वचषकात सहभागी झालेला पाकिस्तानचा क्रिकेट संघ आणि त्यांचे अधिकारी अजूनही भारताकडून व्हिसाच्या प्रतीक्षेत आहेत. पाकिस्तान संघाला २७ सप्टेंबर रोजी दुबईमार्गे हैदराबाद (भारत) गाठायचे आहे. बाबर आझमच्या नेतृत्वाखालील संघाला दोन दिवसांनंतर २९ सप्टेंबरला न्यूझीलंडविरुद्ध पहिला सराव सामना खेळायचा आहे.

पाकिस्तानचा संघ भारतात पोहोचण्यापूर्वी दोन दिवस दुबईत घालवणार होता, पण पाकिस्तान क्रिकेट बोर्डाच्या (पीसीबी) सूत्रांनी पीटीआयला सांगितले की, खेळाडू इस्लामाबादमधील भारतीय उच्चायुक्तांकडून व्हिसाच्या प्रतीक्षेत असल्याने दुबईचा दौरा रद्द करण्यात आला आहे. सूत्रांनी देखील पुष्टी केली की पीसीबीने हा मुद्दा आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेकडे (आयसीसी) उपस्थित केला आहे.

पाकिस्तान क्रिकेट संघाने शेवटचा २०१६ मध्ये टी-२० विश्र्वचषकासाठी भारताचा दौरा केला होता. या दोन देशांमधील तणावपूर्ण संबंधांमुळे भारत आणि पाकिस्तानचे संघ फक्त आशिया कप आणि आयसीसी स्पर्धेत एकमेकांविरुद्ध खेळतात.

सूत्रांनी सांगितले की, पीसीबीने काल पासपोर्ट गोळा करण्यासाठी आपल्या अधिकाऱ्यांना इस्लामाबादला पाठवले होते, पण व्हिसा अद्याप प्रक्रिया सुरू आहे. यामुळे आम्हाला संघाचा दुबईचा दौरा रद्द करावा लागला. व्हिसा वेळेवर मिळाल्यास, संघ २७ सप्टेंबरला दुबईमार्गे हैदराबादला पोहोचेल.

या प्रकरणाशी परिचित असलेल्या आणखी एका सूत्राने सांगितले की, योग्य तपासणी प्रक्रियेनंतर व्हिसा दिला जाईल. पाकिस्तानी पासपोर्टधारकाला भारतीय व्हिसा देण्यासाठी गृह, परराष्ट्र आणि क्रीडा या तीन मंत्रालयांकडून मंजुरी घ्यावी लागते. या संपूर्ण प्रक्रियेला वेळ लागतो पण व्हिसा दिला जाईल.

पाकिस्तानच्या संघात एकूण ३३ सदस्यांचा समावेश आहे. यामध्ये खेळाडूंव्यतिरिक्त तीन राखीव खेळाडू आणि संघ अधिकाऱ्यांचा समावेश आहे. भारतीय क्रिकेट नियामक मंडळ (बीसीसीआय) या स्पर्धेचे यजमान आहे आणि या संदर्भात त्यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही.

पाकिस्तान आपला दुसरा सराव सामना ३ ऑक्टोबरला हैदराबादमध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध खेळणार आहे. त्याच शहरात अनुक्रमे ६ आणि १० ऑक्टोबर रोजी नेदरलँड्स आणि श्रीलंकेविरुद्ध विश्र्वचषक सामने खेळले जातील आणि त्यानंतर १४ ऑक्टोबर रोजी भारताविरुद्धच्या सामन्यासाठी अहमदाबादला भेट देतील.

सध्याच्या पाकिस्तान संघातील केवळ दोनच खेळाडू मोहम्मद नवाज आणि सलमान आगा याआधी क्रिकेट खेळण्यासाठी भारतात आले आहेत.

# टाटा ते रिलायन्स EMI वर सोने विकून करत आहेत भरपूर कमाई



Image Credited - The Financial Express

२०२३ मध्ये सोन्याच्या किमतीत गतवर्षीप्रमाणे वाढ होणार नाही, परंतु त्यानंतरही सोने खरेदीला थोडा ब्रेक नक्कीच आला आहे. याचे एकच कारण आहे आणि ते म्हणजे सध्या ५९ ते ६० हजार रुपयांच्या दरम्यान असलेल्या किमती. यामुळेच आता भारतातील ब्रँडेड रिटेल स्टोअरमध्ये सोने ईएमआयवर खरेदी केले जात आहे.

EMI मध्ये सोने खरेदीच्या वाढीत ५० टक्क्यांहून अधिक वाढ झाली आहे. त्यामुळे या ब्रँडेड रिटेलर्सच्या कमाईत वाढ झाली आहे. ज्यामध्ये टाटा आणि रिलायन्स या दोघांचाही समावेश आहे. ज्वेलरी खरेदी योजनेंतर्गत, ग्राहक दर महिन्याला ज्वेलर्सकडे एक निश्चित रक्कम जमा करतात आणि तेवढ्या रकमेचे सोन्याचे दागिने एका कालमर्यादेत मिळतात. ही एक प्रकारची एचख योजना आहे. ज्यामध्ये तुम्ही दरमहा थोडे पैसे जमा करून सोन्याचे दागिने खरेदी करू शकता.

टाटा समूहाच्या तनिष्क ब्रँडला आर्थिक वर्ष २०२३ मध्ये ठेव योजनेद्वारे ३,८९० कोटी रुपये मिळाले, जे गेल्या आर्थिक वर्षातील २,७०१ कोटी रुपयांपेक्षा ४४ टक्के जास्त आहे. ताज्या वार्षिक अहवालानुसार, रिलायन्स रिटेलने अशा प्रकारे सोने विकून २८२ कोटी रुपये कमावले आहेत, जे एका वर्षापूर्वी १८४ कोटी रुपयांपेक्षा जास्त होते. सहसा, किरकोळ विक्रेते ठेवीदारांना प्रोत्साहन म्हणून हप्त्यांवर काही सूट देतात. उदाहरणार्थ, तनिष्कचे गोल्डन हार्वेस्ट १० महिन्यांच्या योजनेसाठी पहिल्या हप्त्यावर ७५ टक्के सूट देते.

अगदी प्रादेशिक साखळींनीही मासिक ठेव योजना स्वीकारल्या आहेत. महाराष्ट्र आणि गोव्यात ४२ स्टोअर्स चालवणाऱ्या पुण्यातील PNG ज्वेलर्सला FY२०२३ मध्ये ७०० कोटी रुपये मिळाले, जे ऋध२०२२ पेक्षा २७ टक्क्यांनी जास्त आहे. कोलकातास्थित सेन्को गोल्डला गेल्या आर्थिक वर्षात ठेवी म्हणून १९२ कोटी रुपये मिळाले, जे एका वर्षापूर्वीच्या तुलनेत ८९ टक्क्यांनी अधिक आहे.

टायटन कंपनीचे सीईओ अजॉय चावला म्हणाले की, कोविडचा सोन्याचे दागिने खरेदी योजनेवर परिणाम झाला होता, परंतु आता त्याला गती मिळाली आहे. या आर्थिक वर्षाच्या एप्रिल-जून तिमाहीत, मागील आर्थिक वर्षाच्या याच कालावधीच्या तुलनेत योजनेतील नामांकनांमध्ये ५० टक्क्यांनी वाढ झाली आहे. चावला म्हणाले की, तनिष्कच्या विक्रीतील दागिने खरेदी योजनेचा वाटा गेल्या आर्थिक वर्षात १९ टक्के होता आणि यावर्षी तो २१ टक्क्यांपर्यंत जाण्याची अपेक्षा आहे.

पीएनजी ज्वेलर्सचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक सौरभ गाडगीळ म्हणाले की, त्यांच्या विक्रीतील सुमारे २० टक्के सोने खरेदी योजना दागिन्यांच्या खरेदीतून येतात. ते म्हणाले की, सुरुवातीला सोन्याचे भाव वाढल्याने विक्रीत मोठी घट झाली होती, पण लवकरच ग्राहकांना या किमतीची सवय झाली. आगामी सणासुदीच्या काळात या योजनेत अधिक नामांकन मिळण्याची आम्हाला अपेक्षा आहे.

जागतिक सुवर्ण परिषदेच्या मते, भारताचा एकूण सोन्याचा वापर कॅलेंडर वर्ष २०२२ मध्ये २.९ टक्क्यांनी घटून ७९७.३ टनांवरून २०२१ मध्ये ७७४ टन झाला. या वर्षी, विक्रमी उच्च किमतींमुळे किरकोळ खरेदीत घट झाल्यामुळे सोन्याच्या मागणीत वर्षानुवर्षे १० टक्के घट झाल्याचा अंदाज परिषदेचा आहे, जो तीन वर्षांतील सर्वात कमी आहे. यूएस बँकिंग संकटानंतर, सोन्याचा भाव जानेवारीमध्ये ५५,३०० रुपये प्रति १० ग्रॅमवरून वाढून मार्चमध्ये ६०,००० रुपये प्रति १० ग्रॅम झाला. त्यानंतर सोन्याचा भाव ५९,२०० रुपये प्रति १० ग्रॅमवर आला आहे. चावला म्हणाले की, बाजार अस्थिर आहे. ते म्हणाले की, पूर्वी लोक वर्षभर सोने खरेदी करायचे. आता ते फक्त खास प्रसंगीच विकत घेतले जाते. अक्षय्य तृतीया, ओणम, धनत्रयोदशी, दुर्गापूजा किंवा कुटुंबातील कोणतेही लग्न असो.

# भारत नव्हे, तर या देशातील लोक बिअर पिण्यात पहिल्या क्रमांकावर, ते वर्षभरात एक व्यक्ती पितो १४० लिटर बिअर

तुम्हाला माहित आहे का की कोणत्या देशातील लोक सर्वाधिक बिअर पितात? नसेल तर आम्ही तुम्हाला सांगतो. वर्ल्ड ऑफ स्टॅटिस्टिक्स डेटाने जगातील सर्वाधिक बिअर पिणाऱ्या देशांची यादी जाहीर केली आहे. आकडेवारीनुसार, चेक रिपब्लिकमध्ये सर्वाधिक बिअर प्यायली जाते. दारूच्या श्रेणीत इथले लोक बिअर पिणे सर्वात जास्त पसंत करतात. तुम्हाला हे जाणून आश्र्चर्य वाटेल की चेक रिपब्लिकमध्ये एक व्यक्ती एका वर्षात १४० लीटर बिअर पितो. मासिक आधारावर पाहिले तर एक व्यक्ती एका महिन्यात साडेअकरा लिटर बिअर पितात. त्याचवेळी भारताच्या क्रमवारीबद्दल बोलायचे झाले, तर भारत या बाबतीत खूपच खालच्या पातळीवर आहे.

वर्ल्ड ऑफ स्टॅटिस्टिक्सनुसार, सर्वाधिक बिअर पिणाऱ्या देशांच्या यादीतील १० पैकी नऊ देश युरोपमधील आहेत. शीर्ष देशांमध्ये झेक प्रजासत्ताक, ऑस्ट्रिया, रोमानिया, जर्मनी, पोलंड, आयर्लंड, स्पेन, क्रोएशिया आणि लॅटव्हिया यांचा समावेश आहे. टॉप १० मध्ये एकमेव गैर-युरोपियन देश नामिबिया आहे. नामिबियातील प्रत्येक व्यक्ती एका वर्षात ९५.५ लिटर बिअर पितात.

यानंतर ऑस्ट्रिया दुसऱ्या स्थानावर आहे. या देशातील प्रत्येक व्यक्ती एका वर्षात १०७.८ लीटर बिअर पितात. रोमानियामध्ये एक व्यक्ती १००.३ लिटर, जर्मनीमध्ये ९९.८ लिटर आणि पोलंडमध्ये ९७.७ लिटर आहे. आयर्लंडमधील प्रत्येक व्यक्ती एका वर्षात ९२.९ लिटर बिअर पितो. त्याचप्रमाणे स्पेनमध्ये दरडोई वार्षिक बिअरचा वापर ८८.८ लिटर, क्रोएशियामध्ये ८५.५ लिटर आणि लॅटव्हियामध्ये ८१.४ लिटर आहे.

त्यानंतर एस्टोनिया (८०.५ लीटर), स्लोव्हेनिया (८० लीटर), नेदरलँड (७९.३ लीटर), बल्गेरिया (७८.७ लीटर), पनामा (७८.३ लीटर), ऑस्ट्रेलिया (७५.१



Image Credited - Mint

लीटर) आणि लिथुआनिया (७४.४ लीटर) यांचा क्रमांक लागतो. बिअरच्या वापराच्या बाबतीत भारत खूपच मागे आहे. भारतातील सरासरी व्यक्ती एका वर्षात दोन लिटर बिअर पितात. भारताच्या खाली फक्त इंडोनेशिया आहे. इस्लामिक देश इंडोनेशियामध्ये दरडोई वार्षिक वापर फक्त ०.७० लिटर आहे.

# गुणवत्तेचा आलेख घसरला!

शिक्षणावर आर्थिक, सामाजिक परिस्थितीचा परिणाम होत असतो असे मानले जाते. अशा परिस्थितीत राज्यातील विविध संवर्गातील विद्यार्थ्यांच्या संपादणूकीवर नजर टाकली असता संवर्गातील संपादणूकीतील फरक लक्षणीय असल्याचे अधोरेखित होत नाही. गुणवत्ता ही कोणत्या एका संवर्गाची मक्तेदारी असते असेही यावरून म्हणता येत नाही हेही लक्षात घ्यायला हवे. विद्यार्थ्यांना शैक्षणिक वातावरण मिळाले, तर विद्यार्थी संपादणूक संपादन करू शकतात हे यानिमित्ताने पुन्हा समोर आले आहे.

महाराष्ट्र सरकारच्या राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या वतीने घेण्यात आलेल्या राष्ट्रीय संपादणूक सर्वेक्षणाचा अहवाल नुकताच जाहीर करण्यात आला. कोरोनानंतर राज्याच्या वतीने करण्यात आलेले हे पहिले मोठे सर्वेक्षण होते. राज्य परिषदेच्या वतीने मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळाचा उपयोग करत अध्ययन निष्पत्तीवर आधारित ११ हजार ९३३ शाळांमधील विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण करण्यात आले. या सर्वेक्षणात राज्यातील २ लाख ५३ हजार ४४९ विद्यार्थी सहभाग नोंदवला होता. सदरचे सर्वेक्षण हे नमुना निवडीच्या आधारे करण्यात आले. या सर्वेक्षणात राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळा, खासगी अनुदानित शाळांचा सहभाग राहिला आहे. सर्वेक्षणात इयत्ता तिसरी, पाचवी आणि आठवीचे विद्यार्थी सहभागी झाले होते. सर्वेक्षणासाठी निवडलेल्या शाळांपैकी इयत्ता तिसरीसाठी ३ हजार ७५६ शाळा, पाचवीसाठी ४ हजार ५० आणि आठवीकरिता ४ हजार १२७ शाळांमधील विद्यार्थी सहभागी झाले होते. सर्वेक्षणात या शाळांमधील विविध सामाजिक संवर्गातील विद्यार्थी सहभागी झाले होते. राज्याच्या या संपादणूक सर्वेक्षण अहवालात अपवादात्मक इयत्ता आणि एखादा विषय वगळता फार मोठा लक्षणीय आणि दखलपात्र फरक आढळून येत नाही.

केंद्र सरकारने २०१७ ला इयत्ता आणि विषयनिहाय अध्ययन निष्पत्ती निश्र्चित करून दिल्या आहेत. केंद्र आणि राज्य सरकार यापुढे जी सर्वेक्षणे करणार आहेत त्या सर्वेक्षणात अध्ययन निष्पत्तीचे मोजमाप केले जाणार आहे. या सर्वेक्षणातदेखील विषयांच्या अध्ययन निष्पत्तीचे मापन करण्यात आले आहे. या सर्वेक्षणात ग्रामीण भागातील शाळांची गुणवत्ता अधिक असल्याचे स्पष्ट झाले आहे, तर त्याचवेळी खासगी व्यवस्थापनांच्या शाळांपेक्षा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांचा संपादणूकीचा आलेख अधिक उंचावला असल्याचे समोर आले आहे. त्याचबरोबर संवर्गनिहाय विद्यार्थ्यांचा विचार करता संपादणूकीत फार मोठा फरक असल्याचे प्रतिबिंबीत होत नाही. या राज्य सर्वेक्षणात सहभागी झालेल्या एकूण विद्यार्थ्यांचा विचार करता सर्वसाधारण संवर्गातील ६९ हजार ४१६ विद्यार्थी सहभागी झाले आहेत. हे शेकडा प्रमाण २७.३९ टक्के इतके आहे. अनुसूचित जातीचे ४० हजार ६०३ विद्यार्थी सहभागी झाले होते. हे शेकडा प्रमाण १६.०२ टक्के इतके आहे. अनुसूचित जमातीचे ४१ हजार ९१२ विद्यार्थी सहभागी झाले होते. हे प्रमाण १६.५४ टक्के इतके असल्याचे दिसते आहे. इतर मागास प्रवर्गातील ५७ हजार ६६८ विद्यार्थी सहभागी झाले असून हे





शेकडा प्रमाण २२.७५ टक्के इतके आहे. सर्वसाधारण संवर्गातील ६९ हजार ४१६ विद्यार्थी सहभागी असून हे शेकडा प्रमाण २७.३९ टक्के इतके आहे. भटके विमुक्त जाती जमाती संवर्गातील ३९ हजार ७९२ विद्यार्थी सहभागी झाले होते. ते शेकडा प्रमाण १५.७ टक्के इतके आहे. विशेष मागास प्रवर्गातील ४ हजार ५८ विद्यार्थी सहभागी झाले होते. हे शेकडा प्रमाण १.६ टक्के इतके आहे. सर्वाधिक विद्यार्थी सर्वसाधारण संवर्गातील सहभागी झालेले आहेत. त्या खालोखाल इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थी सहभागी आहेत. अनुसूचित जातीचे विद्यार्थी कमी असून ते १६.०२ टक्के आहे, तर सर्वात कमी १.६ टक्के हे विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थी आहेत. शिक्षणावर आर्थिक, सामाजिक परिस्थितीचा परिणाम होत असतो असे मानले जाते. अशा परिस्थितीत राज्यातील विविध संवर्गातील विद्यार्थ्यांच्या संपादणूकीवर नजर टाकली असता संवर्गातील संपादणूकीतील फरक लक्षणीय असल्याचे अधोरेखित होत नाही. गुणवत्ता ही कोणत्या एका संवर्गाची मक्तेदारी असते असेही यावरून म्हणता येत नाही, हेही लक्षात घ्यायला हवे. विद्यार्थ्यांना शैक्षणिक वातावरण मिळाले, तर विद्यार्थी संपादणूक संपादन करू शकतात हे यानिमित्ताने पुन्हा समोर आले आहे.


इयत्ता तिसरीत राज्याच्या भाषेचे सरासरी संपादणूक ७६.९९ टक्के आणि गणिताची ६८.५० टक्के इतकी आहे. सर्वसाधारण संवर्गातील विद्यार्थ्यांची संपादणूक सर्वाधिक आहे. भाषेत ७९.४ टक्के तर गणितात ७१.५ संपादणूक टक्के आहे. भाषेत सर्वात कमी संपादणूक ही अनुसूचित जमातीच्या संवर्गाची आहे. ती म्हणजे ७३.७ टक्के इतकी असून शेकडा ५ दशांस ७ टक्के इतका तो फरक आहे. इतर मागास आणि सर्वसाधारण संवर्गात अवघा १.६ टक्के फरक आहे.गणितात सर्वसाधारण आणि अनु.जमातीच्या संवर्गातील फरक ८.१ टक्के इतका आहे.तर सर्वसाधारण आणि इतर मागास प्रवर्गातील फरक १.६ टक्के इतका आहे. इयत्ता पाचवीच्या संपादणूकीचा विचार करता राज्याची भाषेची संपादणूक सरासरी ६२.२१ टक्के आहे, तर सर्वाधिक संपादणूक ही इतर मागास प्रवर्गातील आहे. ती ६२.१९ टक्के इतकी आहे. सर्वात कमी संपादणूक भटक्या विमुक्त जाती जमातीची असून ती ६१.१५ टक्के इतकी आहे. यातील फरक १.०४ इतकी आहे. गणिताची राज्याची सरासरी ६४.४७ टक्के असून सर्वाधिक संपादणूक इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांची आहे. त्या संवर्गाचे शेकडा प्रमाण ६४.९५ टक्के आहे. सर्वात कमी संपादणूक अनुसूचित जाती संवर्गातील विद्यार्थ्यांची असून हे शेकडा प्रमाण ६२.२४टक्के इतके आहे. यातील फरक २.६८ टक्के इतका आहे. आठवीची भाषा विषयाची सरासरी संपादणूक ६९.५२ टक्के आहे. भाषेत सर्वसाधारण संवर्गातील विद्यार्थ्यांची संपादणूक सर्वात जास्त आहे ती ७२.७४ टक्के इतकी आहे. सर्वात कमी ६६.३८ टक्के ही अनुसूचित जमातीची आहे.यातील फरक ६.३६ टक्के इतका आहे.गणिताची राज्याची सरासरी संपादणूक ४९.१० टक्के आहे.येथे सर्वाधिक संपादणूक सर्वसाधारण संवर्गातील असून ते प्रमाण ४९.२४ इतके आहे.तर सर्वात कमी ४६.७८ टक्के संपादणूक असून हे अनुसूचित जाती संवर्गातील विद्यार्थ्यांचे आहे.हा फरक अवघा २.४६ टक्के आहे.

राज्यात दहावी, बारावी प्रमाणे प्राथमिक स्तरावरदेखील संपादणूक पातळीत संपादनात मुलींची आघाडी असल्याचे समोर आले आहे. या सर्वेक्षणात १ लाख २३ हजार १०९ विद्यार्थी आणि एक लाख ३० हजार ३४० विद्यार्थिनी सहभागी झाले होता. शेकडा प्रमाणाचा विचार करता ४८.५७ टक्के विद्यार्थी आणि ५१.४३ टक्के विद्यार्थिनींचे प्रमाण आहे. इयत्ता तिसरीत भाषा विषयातील विद्यार्थ्यांची सरासरी संपादणूक ७६.१२ टक्के आहे. विद्यार्थिनींची संपादणूक ७७.८३ टक्के आहे. गणितात विद्यार्थ्यांची सरासरी संपादणूक ६७.६७ टक्के, तर विद्यार्थिनींची संपादणूक ६८.९८ टक्के इतकी आहे. इयत्ता पाचवीसाठी मराठी भाषेत विद्यार्थ्यांची सरासरी संपादणूक ६१.३ टक्के आहे. विद्यार्थिनींची सरासरी ६३.३७ टक्के आहे. गणित विषयाचा विचार करता विद्यार्थ्यांची सरासरी संपादणूक ६२.७२ टक्के, तर विद्यार्थिनींची सरासरी संपादणूक ६४.४६ टक्के आहे. इयत्ता आठवीसाठी मराठी विषया संदर्भात विद्यार्थ्यांची सरासरी संपादणूक ६८.८० टक्के, तर विद्यार्थिनींची सरासरी संपादणूक ७०.९८ टक्के आहे. गणित विषयात विद्यार्थ्यांची सरासरी ४८.२७ टक्के असून विद्यार्थिनींची ४८.६७ टक्के आहे. या सर्व विषयांच्या संपादणूकीच्या आकडेवारीवर विचार केला, तर विद्यार्थिनींची संपादणूक सर्वच विषयांमध्ये अधिक आहे. शैक्षणिक संपादणूकीचा विचार करता मुलींचा हा वरचष्मा विद्यार्थी आणि पालकांना निश्र्चित विचार करायला भाग पाडणारा आहे. एकीकडे विद्यार्थ्यांसाठी पालक अधिकाधिक चिंता वाहत आहेत. आपल्या समाजात नाही म्हटले तरी मुलगा आणि मुलगी असा भेद कायद्याने होत नसला तर मनात आहे. अर्थात सर्वच पालकांच्या मनात हा भेद आहे असे नाही, मात्र भेद केला जात नाही असे म्हणणे धाडसाचे होईल. अशा परिस्थितीत मुलांच्या शिक्षणाच्याबाबतीत पालक अधिक दक्षता घेताना दिसतात. मुलासाठी शिकवणीबरोबर इतरही गुंतवणूक मोठ्या प्रमाणावर केली जात असते. असे असतानादेखील मुलांचा गुणवत्तेचा मात्र आलेख घसरलेला दिसतो आहे. खरंतर यामागील कारणांचा संशोधनाची गरज आहे. राज्यातील विद्यार्थ्यांची गुणवत्ता कोरोनानंतर काही प्रमाणात सुधारत असल्याचे प्रतिबिंबीत होत आहे, मात्र शंभर टक्के शैक्षणिक संपादन प्राप्त करण्यासाठी प्रयत्न करावे लागणार आहे.

हे पत्र, मुद्रक निखील जयप्रकाश माने यांनी मालक, प्रकाशक, संपादक अशोक व्यंकटराव चिंचोले यांचे करिता चेतन ऑफसेट प्रिंटर्स, १७ शिवाजी हौसिंग सोसायटी, पद्मानगर बार्शी रोड, लातूर येथे मुद्रित केले. हे पत्रक प्रकाशक अशोक व्यंकटराव चिंचोले यांनी दै. भूकंप कार्यालय, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स गांधी चौक, लातूर, ता.जि. लातूर ४१३५१२(महा.) येथे प्रकाशीत केले. संपादक- अशोक व्यंकटराव चिंचोले ((:-२५१८२२) RNI NO. MAHMAR/2012/42770

# आरोग्य

## चिंच खाल्ल्याने मासिक पाळीतील 'हे' त्रास होतील दूर



तुम्हाला माहिती असेल की, चिंच खाल्ल्यानंतर आपलं तोंड तुरट होते. तरीही ती आपण आवडीने खातो. काही लोकांना याची चटणी खायला फार आवडते. या व्यतिरिक्त विविध पदार्थांसाठी त्याचा वापर केला जातो. मात्र तुम्हाला माहितेय का, चिंच खाणे आरोग्यासाठी फायदेशीर असते. खरंतर चिंचात अँन्टीऑक्सिडेंट, फाइटोकेमिकल्ससह व्हिटॅमिन ए, सी, ई, के, बी ६, मॅग्नीशियम, फास्फोरस, कॅल्शियम, प्रोटीन सारखे अन्य महत्त्वपूर्ण तत्त्व असतात.

**कोलेस्ट्रॉलचा स्तर कमी होतो**

चिंचात पॉलीफेनोल्स आणि फ्लेवोनोइड्स खुप असतात. हेच कारण आहे की, ते तुमचा कोलेस्ट्रॉलचा स्तर संतुलित राखण्यास मदत करते. चिंच तुमचा कोलेस्ट्रॉलचा स्तर कमी करू शकते. त्याचसोबत एथेरोस्क्लेरोसिसचा धोका कमी होऊ शकतो.

**त्वचेसाठी फायदेशीर**

चिंचेत अँन्टीऑक्सिडेट, फ्लेवोनोइड्स आणि व्हिटॅमिन सी आणि ए सारखे मिनिरल्स असतात. यामुळे ते खाणे शरीरासाठी फायदेशीर असते. तुमच्या शरीरात फ्री रेडिकल्स रोखण्यास चिंच मदत करते.

**केस मजबूत होतात**

जर तुमचे केस सतत गळत असतील तर अशा स्थितीत तुम्ही चिंच खाऊ शकता. कारण यामुळे केसांसंबंधित समस्या दूर करण्यासाठी फायदेशीर ठरू शकते. याचे नियमित सेवन केल्याने केस मजबूत होतात आणि केस गळण्याची समस्या ही दूर होते.

**मासिक पाळी**

मासिक पाळी दरम्यान त्रास होत असेल तर हार्मोनल इम्बॅलन्स होऊ नये म्हणून काळजी घेणे फायदेशीर असते. त्यावेळी चिंचेचे पाणी पिणे फायदेशीर ठरू शकते.

## स्क्रब टायफसमुळे चिंता वाढली, लक्षणं आणि बचाव जाणून घ्या

ओरिसासह देशातील अनेक राज्यांमध्ये स्क्रब टायफस आजाराची प्रकरणे समोर येत असून, त्याबाबत आरोग्य तज्ज्ञांनी चिंता व्यक्त केली आहे. अलीकडील अहवालानुसार, महाराष्ट्र आणि ओडिशातील सुमारे तीन जिल्ह्यांमध्ये रुग्णांची संख्या वाढली आहे. महाराष्ट्रात २० हून अधिक लोकांना संसर्ग झाल्याची पुष्टी झाली असून, राज्यातील एकूण रुग्णांची संख्या आता ३०७ पेक्षा जास्त झाली आहे. गेल्या २४ तासांत आणखी नऊ जणांमध्ये संसर्गाची पुष्टी झाली असून, राज्यातील एकूण रुग्णांची संख्या २३० हून अधिक झाली आहे. महाराष्ट्र आणि ओडिशासोबतच हिमाचल प्रदेश, उत्तराखंड आणि राजस्थानलाही स्क्रब टायफसच्या धोक्यांबाबत सतर्क करण्यात आले आहे.

स्क्रब टायफस हा जीवघेणाही ठरू शकतो, या संसर्गाची लागण झालेल्या लोकांपैकी सहा टक्के लोक वेळेवर उपचार न मिळाल्याने त्यांचा मृत्यू होतो, असे आरोग्य तज्ज्ञांचे म्हणणे आहे. या वाढत्या धोक्याबाबत सर्वांना सतर्क करण्यात आले आहे. चला जाणून घेऊया हा आजार काय आहे आणि त्यामुळे कोणते धोके होऊ शकतात?

**स्क्रब टायफस बद्दल जाणून घ्या**

स्क्रब टायफस, ज्याला बुश टायफस असेही म्हणतात, हा ओरिएंटिया सुत्सुगामुशी या जीवाणूमुळे होणारा संसर्गजन्य रोग आहे. मुख्यतः हा संसर्ग संक्रमित चिगर्स (लार्व्हा माइट्स) च्या चाव्याव्दारे लोकांमध्ये पसरतो. बाधित व्यक्तीला ताप, डोकेदुखी, अंगदुखी आणि कधी कधी अंगावर पुरळ येऊ शकते. या आजारावर वेळीच उपचार न केल्यास तो गंभीर स्वरूप धारण करण्याचा धोका असतो. रोगाची बहुतेक प्रकरणे ग्रामीण भागात आढळतात जेथे चिगर्सच्या संपर्कात येण्याचा धोका जास्त असू शकतो.

**या आजाराची लक्षणे जाणून घ्या**

आरोग्य तज्ञ म्हणतात, स्क्रब टायफसची लक्षणे साधारणपणे संक्रमित चिगर्स चावल्यानंतर १० दिवसांच्या आत सुरू होतात. सुरुवातीला, ताप आणि थंडी वाजून येणे, डोकेदुखी, शरीर आणि स्नायू दुखणे आणि चिगर चाव्याच्या ठिकाणी काळे किंवा खवले पुरळ येणे अशी समस्या असते.

त्याची लक्षणे काय आहेत?

ताप

थंडी जाणवणे

डोकेदुखी

अंगदुखी


कोरडा खोकला

धाप लागणे

शरीरातील पांढऱ्या रक्त पेशी कमी होणे

चावलेल्या ठिकाणी पुरळ

रक्तातील अल्ब्युमिनची पातळी वाढणे



स्क्रब टायफसवर वेळीच उपचार न केल्यास गोंधळापासून कोमापर्यंतच्या मानसिक समस्यांसारख्या अनेक गंभीर समस्या उद्भवू शकतात, असे आरोग्य तज्ज्ञांचे म्हणणे आहे. गंभीर आजार असलेल्या लोकांमध्ये अवयव निकामी होणे आणि अंतर्गत रक्तस्त्राव होऊ शकतो, जो घातक मानला जातो.

**स्क्रब टायफसचा उपचार कसा केला जातो?**

जे लोक या संसर्गजन्य रोगासाठी सकारात्मक चाचणी करतात त्यांना रोगाची तीव्रता कमी करण्यासाठी प्रतिजैविक दिले जातात. याशिवाय, इतर लक्षणे लक्षात घेऊन उपचारासाठी इतर आवश्यक पद्धती वापरल्या जातात. रोगाची तीव्रता कमी करणे आणि रुग्णाला कोमासारख्या समस्यांपासून वाचवणे हा डॉक्टरांचा उद्देश आहे.

जर तुम्ही प्रभावित भागात राहत असाल, तर प्रतिबंधासाठी सतत प्रयत्न करत राहा, जेणेकरून या आजाराचा धोका कमी करता येईल.

**संरक्षणासाठी काय करावे?**

स्क्रब टायफसपासून बचाव करण्यासाठी सध्या कोणतीही लस उपलब्ध नाही, परंतु तुम्ही संक्रमित चिगर्सशी संपर्क टाळून स्क्रब टायफसचा धोका कमी करू शकता. स्क्रब टायफसची प्रकरणे नोंदवली जात असलेल्या भागात प्रवास करताना. चिगर्स वनस्पती आणि झुडुपे असलेल्या भागात आढळू शकतात आणि त्यांच्या चाव्यामुळे तुम्हाला रोगाचा धोका होऊ शकतो. या रोगापासून स्वतःचे संरक्षण करण्यासाठी केवळ प्रतिबंधच मदत करू शकतात.

कसे टाळावे

स्वच्छतेची काळजी घ्या

शेतात किंवा गवताळ प्रदेशात जाताना शूज घाला

पूर्ण बाह्यांचे शर्ट आणि पँट घाला

ओलसर ठिकाणी राहणे टाळा

ओल्या मातीत खोदणे टाळा

## नावडत्या भेंडीचे आहेत अगणित फायदे

कारल्याप्रमाणेच भेंडी देखील अनेकांची नावडती भाजी आहे. भेंडीच्या चिकटपणामुळे अनेकजण ही भाजी खात नाहीत. मात्र, अनेकजण ही भाजी आवडीने खातात. खरंतर, या भेंडी खाण्याचे अनेक फायदे आहेत. जे वाचून तुम्ही देखील आवडीने ही भाजी खाल.

**भेंडीचे अगणित फायदे**

भेंडी हृदय निरोगी ठेवते. यात असलेले पॅक्टिन कोलेस्टरॉल कमी करण्यास मदत करते. तसेच फायबर रक्तातील कोलेस्टरॉल नियंत्रित करतो, ज्याने हृदय विकाराता धोका कमी होतो.

भेंडीचे सेवन केल्यास तुम्ही कॅंसरला हा गंभीर आजार दूर करु शकता. भेंडीमुळे आतड्यांमध्ये असलेले विषारी तत्त्व बाहेर काढण्यास मदत करते.

भेंडीत फोलेट नावाचा एक पोषक तत्त्व असतो जो गर्भाच्या मस्तिष्काचा विकास करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका निभावतो.

भेंडी भरपूर फायबर असणारी भाजी आहे. यात असणारे फायबर पचन तंत्रासाठी फायदेशीर असते.



यामुळे पोटफुगी, कब्ज, पोट दुखणे आणि गॅस सारख्या समस्या होत नाही.

भेंडी तुमचे वजन कमी करण्यात मदत करते. तसेच तुमच्या त्वचेला टवटवीत ठेवते.


भेंडीचा वापर तुम्ही केस सुंदर, दाट आणि चमकदार बनवण्यासाठी देखील करु शकता.

## रोज ड्रायफ्रुट्स खाणाऱ्यांनी घ्यावी काळजी, त्यांच्याकडून होत आहे ही चूक

तुम्हाला निरोगी राहायचे असेल, तर तुमच्या आहारात सुक्या मेव्यांचा समावेश करा. सुका मेवा देखील आपल्या आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे. परंतु जर ते जास्त प्रमाणात खाल्ले, तर ते आपले नुकसान करू शकतात. अन्न हेल्दी असले तरी ते जास्त प्रमाणात खाल्ल्याने आरोग्याला हानी पोहोचते.

त्याचबरोबर जर तुम्ही आवश्यकतेपेक्षा जास्त ड्रायफ्रूट्स खात असाल तर त्यामुळे होणाऱ्या हानीबाबतही तुम्हाला माहिती असायला हवी. ड्रायफ्रुट्स जास्त प्रमाणात खाण्याचे काय तोटे आहेत ते जाणून घेऊया.

रोज ड्रायफ्रुट्स खाल्ल्याने




शरीराला आवश्यक पोषक तत्व मिळतात. आपल्याला सामान्यतः ओमेगा ३ फॅटी ॲसिड आणि अमीनो ॲसिड्स अन्नातून मिळत नाहीत, ज्याची कमतरता सुक्या मेव्यांद्वारे भरून काढली जाते. बियांमध्ये आढळणारे तेल देखील आपल्या आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे. परंतु त्यांचे जास्त प्रमाण आरोग्यास हानी पोहोचवू शकते. त्यामुळे जर तुम्ही रोज ड्रायफ्रुट्स खात असाल, तर भिजवलेले बदाम आणि मनुके खा.

पौष्टिकतेचा विचार केला, तर प्रौढांनी २५ ते ५० ग्रॅम सुका मेवा खावा. यामध्ये तुम्ही ६-७ ग्रॅम बदाम, चार काजू, अर्धा चमचा खरबूज आणि टरबूजाचे दाणे, अर्धी वाटी मखना आणि काही मनुके खाऊ शकता. सुका मेवा मर्यादित प्रमाणात खाल्ल्याने शरीरातील आवश्यक पोषक तत्वांची कमतरता पूर्ण होते.

तुमच्या शरीराला किती सुक्या मेव्याची गरज आहे, यावर आहारतज्ज्ञही लक्षात ठेवतात. एखाद्याला कोणताही आजार असला, तरी त्यांच्यासाठी वेगळा डोस असेल. मुलासाठी स्वतंत्र व्यवस्था असेल. त्याच वेळी, जर एखादी महिला गर्भवती असेल, तर तिला तिच्या शारीरिक स्थितीनुसार खाण्याचा सल्ला दिला जातो.

जास्त प्रमाणात ड्रायफ्रुट्स खाल्ल्याने कॅलरीज आणि फॅट वाढू शकते. याशिवाय शरीरातील रक्तातील साखरेचे प्रमाणही वाढू शकते. ड्रायफ्रुट्स खाण्यासोबतच जर तुम्ही दररोज पुरेसे पाणी पीत नसाल, तर डिहायड्रेशन देखील होऊ शकते.

## कॅन्सर ओळखला जाईल वेळेवर, करा या ३ टेस्ट




जगभरात दरवर्षी कर्करोगाचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे. या आजारावर उपचार करण्यासाठी अनेक नवीन तंत्रज्ञान आले असले तरीही कॅन्सरमुळे होणारे मृत्यू अजूनही कमी होत नाहीत. डॉक्टरांचे म्हणणे आहे की कॅन्सरची बहुतांश प्रकरणे अजूनही प्रगत अवस्थेत आहेत. याचा अर्थ असा की जेव्हा रोग खूप गंभीर होतो, तेव्हा रुग्ण डॉक्टरकडे जातो. हा रोग टाळण्यासाठी, वेळेत शोधणे महत्वाचे आहे. यासाठी कर्करोगाचा शोध घेण्यासाठी कोणत्या चाचण्या कराव्यात हे लोकांना माहिती असायला हवे. कॅन्सर ओळखण्यासाठी तुम्ही कोणत्या चाचण्या करू शकता, ते आम्ही तुम्हाला सांगतो. विशेषत: आम्ही तुम्हाला त्या कर्करोगाच्या चाचण्यांबद्दल सांगणार आहोत, ज्यांच्या केसेस सर्वात जास्त येत आहेत.

प्रथम आपण स्तनाच्या कर्करोगाबद्दल बोलूया. सध्या महिलांमध्ये स्तनाच्या कर्करोगाचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे. हा कर्करोग ओळखण्यासाठी एक चाचणी केली जाते.

**मॅमोग्राम चाचणी**

कर्करोग शल्यचिकित्सक सांगतात की, स्तनाचा कर्करोग ओळखण्यासाठी मॅमोग्राम चाचणी सर्वोत्तम आहे. या चाचणीद्वारे, स्तनाच्या ऊतींमध्ये कोणतीही विकृती आढळून येते. महिलांमध्ये होणारा दुसरा सर्वात सामान्य कर्करोग म्हणजे गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग. हा कर्करोग ओळखण्यासाठी पॅप चाचणी केली जाऊ शकते.

**कोलोनोस्कोपी**

सध्या आतड्यांसंबंधी कर्करोगाच्या रुग्णांमध्येही लक्षणीय वाढ होत आहे. हा कर्करोग ओळखण्यासाठी कोलोनोस्कोपी चाचणी केली जाऊ शकते. या चाचणीत कोलनची तपासणी केली जाते. याद्वारे, कोलनमध्ये वाढणारी कोणतीही ऊतक सहजपणे शोधता येते.

**ldct चाचणी**

या चाचणीद्वारे तुम्ही फुफ्फुसाचा कर्करोग सहज ओळखू शकता. जे लोक धूम्रपान करतात आणि त्यांना सतत खोकल्याची समस्या असते त्यांनी ही चाचणी नक्कीच करून घ्यावी.

**या लक्षणांकडे लक्ष द्या**

कॅन्सर सर्जन सांगतात की, कॅन्सरची चाचणी घेण्यापूर्वी त्याची लक्षणे जाणून घेणे गरजेचे आहे. हे पाच बदल शरीरात होत असतील तर डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

अचानक वजन कमी होणे

शरीराच्या कोणत्याही भागात गाठ

ओटीपोटात सतत वेदना

भूक न लागणे

५ आठवड्यांपेक्षा जास्त खोकला

## खाण्याचा, चघळण्याचा, खाजवण्याचा आवाज आल्यावर तुम्ही अस्वस्थ होत असाल, तर हे वाचा

मेट्रो, लोकल, बस असो वा रिक्षा तुम्ही अनेकवेळा लोकांना हेडफोन लावून प्रवास करताना पाहिलं असेल.

अर्थात ते स्वमर्जीनं हेडफोन वापरतात हे निश्रि्चत परंतु हेडफोन लावणं हे त्यांच्यासाठी आवश्यकच असेल तर? म्हणजे त्यांच्या मर्जीविरोधात हेडफोन लावावा लागत असेल तर?

हो! काही लोकांना हेडफोन लावावाच लागतो. २८ वर्षांच्या मार्गोट नोएल यांना हेडफोन लावावाच लागतो. एका विशेष त्रासाापासून स्वतःला वाचवण्यासाठी त्यांना ते करावंच लागतं.

मार्गोट नोएल यांना मिसोफोनिया आहे. सोप्या शब्दात सांगायचं झालं तर मिसोफोनिया ही एक डिसॉर्डर आहे. यामध्ये वरवर सामान्य वाटणाऱ्या आवाजांनी या लोकांना राग येतो आणि त्यांची चिडचिड होते.

यामुळे ते नाराज होतात, कधी ते भयभीतही होतात, कधी त्यांना पॅनिक अटॅकही येऊ शकतो.

काही आवाज ऐकल्यावर त्यांच्या मेंदूतील इंद्रियांच्या संवेदनांशी जोडणारा भाग एकदम वेगानं सक्रीय होतो.

आपल्याजवळ कोणी श्र्वासोच्छवास करतंय, खाजवतंय, खाताना होणारा आवाज, ओरखडे काढणे, पेनाचा आवाज अशा सामान्य लहानशा आवाजांनी काही लोक चिडचिडे होतात, त्यांना राग येऊ शकतो हे तुम्हाला माहिती आहे का?

ज्या लोकांना ही डिसऑर्डर असते त्याला मिसोफोनिया म्हणतात.

**मिसोफोनिया काय आहे?**

मिसोफोनिया ही स्थिती राग, चिंता आणि घृणेशी जोडली जाते.

मिसोफोनिया ही एक मज्जासंस्थेशी निगडित डिसऑर्डर आहे. कोलाहलाची किंवा गोंगाटाची घृणा असं त्याला म्हणता येईल.

या स्थितीत काही विशेष आवाज किंवा त्या संबंधी गोष्टी-वस्तूंबद्दल तुमची सहनशीलता कमी होते. त्यामुळे व्यक्तीला राग येऊ लागतो, भीती-चिंता वाटू लागते.

एका सेकंदाच्या हजाराव्या भागापेक्षाही कमी कालावधीत हे आवाज तुमच्या मेंदूला काहीतरी चुकीचं आहे असा संदेश देतात.

हे आवाज एका संकटाच्या रुपाने तुमच्या मेंदूतल्या अलार्म सिस्टिम 'अमिग्डला'ला जागं करतात.

त्याला प्रतिक्रिया द्यायला तात्काळ ॲड्रिनल ग्रंथी आण कॉर्टिसोल हार्मोन सज्ज होतात.

सामान्य व्यक्तीसाठी एरव्ही हे आवाज कधीही धोकादायक नसतात.

किती लोकांना याचा त्रास होतो हे माहिती नाही, मात्र ओसीडी म्हणजे मंत्रचळ, टिनिटस म्हणजे कानात विचित्र आवाज येत राहाणं, हायपरेक्युसिस म्हणजे सामान्य पातळीचा आवाजही मोठा ऐकू येणं, ऑटिझम म्हणजे स्वमग्नता, सेन्सरी प्रोसेसिंग डिसॉर्डर अशा आजारांनी-मानसिक अवस्थांनी त्रस्त असणाऱ्यांमध्ये मिसोफोनिया असणं अगदी सामान्यच आहे.

हे का होतं याचं कारण आजही स्पष्ट नाही. मात्र ही स्थिती मेंदू किंवा मनोविकाराशी जोडलेली असू शकते असं शोधकांचं म्हणणं आहे.

किंग कॉलेज लंडन आणि ऑक्सफर्ड विद्यापीठातील संशोधकांच्या अभ्यासात या स्थितीची लक्षणं ब्रिटनमध्ये १८.४ टक्के लोकांत दिसून आली. म्हणजे प्रत्येक पाच लोकांत एका व्यक्तीला इतरांच्या खाण्याचा आवाज, च्युइंगम चघळणं किंवा घोरण्याच्या आवाजाचा त्रास होतो.

लेखिका डॉ. सिलिया व्हिटोरतौ सांगतात, बहुतांशवेळा मिसोफोनियाग्रस्त व्यक्तीला आपण एकटं पडल्याचं वाटतं. मात्र वास्तविक स्थिती अशी नाही. ती लक्षात घेऊन आपल्या जीवनाशी तिचा ताळमेळ लावला पाहिजे.

**मिसोफोनियाचा रोजच्या जगण्यावर परिणाम**

केंट इथल्या ओलाना टॅन्सली हँकॉक सांगतात, की त्यांना मिसोफोनियाची लक्षणं वयाच्या ८ व्या वर्षापासून जाणवतात.

त्या सांगतात, मला श्र्वासांचा आवाज, खाताना होणारा आवाज, सुक्या पाचोळयातून किंवा कागदाचा होणारा आवाज ट्रिगर करतो.

ओलाना सांगतात, हे आवाज आले तर ते तात्काळ थांबावेत यासाठी मी प्रयत्न करते किंवा तिथून दूर जाते. मी दीर्घकाळ सिनेमागृहांत जाणं टाळलं. मी फक्त तीन महिन्यात नोकरी सोडली. पण हळूहळू या प्रकाराला कसं हाताळायचं हे लक्षात आलं आणि मी आता इअरप्लग वापरते.

**जाणकार काय सांगतात?**

जाणकारांच्यामते मिसोफोनियाचा त्या व्यक्तीच्या नातेसंबंधावर आणि लोकांमध्ये मिसळण्यावर फार गंभीर परिणाम होतो. जर लहान मुलांमध्ये याची लक्षणं दिसत असतील तर त्या मुलांच्या अभ्यासावर परिणाम होतो, ती मुलं शाळेत जाणं टाळू लागतात.

या स्थितीत कोणत्याही व्यक्तीबरोबर वेळ घालवणं एक आव्हान होऊन बसतं. समोरच्या व्यक्तीने केलेल्या आवाजांना ते सहन करू शकत नाहीत.

समोरची व्यक्ती याबद्दल अनभिज्ञ असताना त्यांना हा त्रास होतोय असं सांगितलं तर गोंधळ उडू शकतो, वाद होऊ शकतात. नाराजी ओढावली जाते.

अशीच एक स्थिती अमेरिकेत मिसोफोनिया थीम असणाऱ्या पॉडकास्टचे चालक अदिल अहमद यांच्याबरोबर उद्भवली



होती. त्यांना मिसोफोनियाचा त्रास होतो. बीबीसीशी बोलताना ते म्हणाले, कधीकधी आमच्यासारखे लोक अशा वळणावर येऊन पोहोचतात की त्यांचे आईवडीलही दुरावतात. कारण त्यांच्याकडून कळत नकळत होणारे आवाज आम्हाला त्रास देतात हे त्यांना माहिती नसतं.

ऑक्सफर्ड विद्यापीठातील संशोधक डॉ. जॉन ग्रेगरी सागतात, या आजाराने ग्रस्त असणाऱ्या लोकांमध्ये बहुतांश 'फाइट किंवा फ्लाइट' अशी निती दिसून येते. म्हणजे हे लोक परिस्थितीशी झगडतात तरी किंवा ते तिथून निघून तरी जातात.

न्यू कॅसल विद्यापीठाचे डॉ. सुखविंदर कुमार बीबीसीशी बोलताना म्हणाले, जेव्हा मिसोफोनिया रुग्ण असे आवाज ऐकतात तेव्हा ते अचानक जास्तच सक्रीय होतात. त्यांना राग येऊ लागतो. हे आवाज तसे सामान्यच असतात पण या रुग्णांना ते जास्त सक्रीय करतात.

**मिसोफोनियाचं मुख्य लक्षण**

यात कानाची आवाज ऐकण्याची सहनशीलता कमी होते आणि एक नकारात्मक प्रतिक्रिया देणं हे त्याचं मुख्य लक्षण आहे.

श्वास घेणं किंवा दुसऱ्या व्यक्तीनं खाताना केलेला सततचा आवाज मिसोफोनिया असलेल्या व्यक्तीमधील लक्षणं एकदम ट्रिगर करतात.

साधारणतः श्वास घेणं, खातानाचे आवाज याने त्यांना त्रास होतो. माणसानं केलेल्या आवाजानंच नव्हे तर इलेक्ट्रॉनिक उपकरणांच्या आवाजानेही त्रास होतो आणि ते लोक तिथून लगेच बाजूला जातात.

ते आपले कान झाकून घेतात आणि या आवाजामुळे राग येतो आणि त्याना पॅनिक अटॅकही येतो.

अदिल अहमद सांगतात, हे आवाज श्र्वासोच्छवासाचे असोत वा खाण्याचे मी ते सहनच करू शकत नाही. त्याने राग येतो आणि मी तिथून दूर जातो.

अर्थात समोरच्या व्यक्तीला आम्हाला याचा त्रास होतो हे माहिती असेल तर त्यामुळे आमच्यावरचा ताण थोडा कमी होतो.

**मिसोफोनिया बरा होऊ शकतो का?**

संशोधकांना आतापर्यंत मेंदूला असं ट्रिगर करणाऱ्या आवाजांना थांबवण्यासाठी शास्त्रीय दृष्ट्या काही उत्तर सापडलेलं नाही.

अर्थात, नजिकच्या काळात मिसोफोनियावर कॉग्निटिव्ह बिहेवियर थेरपी म्हणजे सीबीटीनं उपचार करण्याचे प्रयत्न मनोविकारतज्ज्ञांनी केलेले आहेत.

यासाठी ९० व्यक्तींवर उपचार करण्यात आले त्यातील ४२ टक्के लोकांमध्ये सुधारणा दिसून आली. याला आणखी एक पर्याय आहे मात्र तो प्रमाणित नाही. यात ऑडिओलॉजिस्टकडून टिनिटस रिट्रेनिंग थेरपी केली जाऊ शकते. भारतात याचा किती लोकांना त्रास होतो याची आकडवारी उपलब्ध नाही मात्र ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ स्पिच अँड हिअरिंगच्या ऑनलाइन सर्वेक्षणानुसार १५.८५ टक्के लोकांमध्ये अशी लक्षणं आढळली.

## भारताला मोठा धक्का, तिसऱ्या वनडे सामन्यातून अक्षर पटेल बाहेर, विश्वचषकाआधी चिंता वाढली

मुंबई : भारतीय क्रिकेट चाहत्यांसाठी चिंतेची बातमी समोर आली आहे. २७ सप्टेंबर रोजी राजकोट येथे होणाऱ्या तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात डावखुरा फिरकीपटू अक्षर पटेलच्या खेळण्याबाबत साशंकता आहे. आशिया चषकात बांगलादेशविरोधात अक्षर पटेल याला दुखापत झाली होती. त्यामुळे पहिल्या दोन सामन्यात त्याला आराम देण्यात आला होता. पण अक्षर पटेल याच्या फिटनेसमध्ये सुधारणा नसल्याचे दिसतेय. अक्षर पटेल याबाबत बीसीसीआयकडून अद्याप अधिकृत माहिती देण्यात आलेली नाही.

## हवामान विभागाची मोठी घोषणा, मान्सूनचं अखेर टाटा, बाय-बाय!

मुंबई : कुठे अधिक तर कुठे कमी पाऊस अशी परिस्थिती असताना, आता नैऋत्य मान्सून देशातून माघारी फिरण्यास सुरुवात झाली आहे. आज वायव्य राजस्थानातून मान्सून माघारी फिरला. मागील ५ दिवसांपासून वायव्य राजस्थानात पाऊस नाही. सोबतच कोरडे वातावरण असल्यानं भारतीय हवामान विभागाकडून देशातून मान्सून मागे फिरत असल्याची घोषणा केली आहे.

यंदा मान्सूनचा परतीचा प्रवास उशिराने सुरु झाला आहे. सर्वसाधारणपणे १७ सप्टेंबरला मान्सून माघारी फिरत असतो, मात्र यंदा २५ सप्टेंबर रोजी मान्सून परतण्यास सुरुवात झाली आहे. याआधी भारतीय हवामान विभागाने २५ सप्टेंबरच्या आसपास मान्सूनच्या परतीच्या प्रवासाला सुरुवात होईल, असं सांगितलं होतं. यानंतर आज हवामान विभागाने घोषणा करत मान्सूनचा परतीला प्रवास सुरु झाल्याचं सांगितलं आहे. नैऋत्य मान्सून सामान्यपणे १ जून रोजी केरळमध्ये दाखल होतो, त्यानंतर ८ जुलैपर्यंत संपूर्ण देश व्यापतो. साधारणपणे १७ सप्टेंबरपासून मान्सूनच्या परतीच्या प्रवासाला सुरुवात होते. त्यानंतर १५ ऑक्टोबरपर्यंत हा परतीचा प्रवास सुरु असतो.

# खेळाडू केंद्रबिंदू मानून क्रीडा क्षेत्राच्या विकासासाठी प्रयत्न

## -क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे

लातूर : राज्यात आंतरराष्ट्रीय खेळाडू घडावेत, यासाठी राज्य शासनाचा क्रीडा विभाग प्रयत्नशील आहे. यासाठी खेळाडू केंद्रबिंदू मानून विविध उपक्रम, योजना राबविण्यात येत असल्याची माहिती क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांनी दिली. तसेच लातूर जिल्ह्याला कुस्तीची उज्ज्वल परंपरा असून युवा खेळाडूंना प्रोत्साहन मिळावे, उदगीर येथे लवकरच स्व. खाशाबा जाधव चषक राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.



उदगीर येथील पोस्ते पोतदार लर्न कॅम्पसमध्ये आयोजित राज्यस्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेचे उद्घाटनप्रसंगी ना. बनसोडे बोलत होते. त्यांच्या हस्ते बजरंगबली, स्व. खाशाबा जाधव, रुस्तम ए हिंद हरिश्चंद्र बिराजदार यांच्या प्रतिमेचे पूजन करून स्पर्धेचे उद्घाटन झाले. यावेळी मानाची गदा देवून ना. बनसोडे यांचे स्वागत करण्यात आले.

अर्जुन पुरस्कारप्राप्त कुस्ती प्रशिक्षक काका पवार, शिवछत्रपती राज्य क्रीडा जीवन गौरव पुरस्कार प्राप्त प्रा. गणपतराव माने, उपविभागीय अधिकारी सुशांत शिंदे, जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे, तहसीलदार रामेश्र्वर गोरे, शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त धर्मपाल गायकवाड, दत्ता गलाले, पवनराज पाटील, माजी नगरसेवक तथा राष्ट्रीय खेळाडू फयाज शेख, संगमेश्र्वर काळे, पोलीस निरीक्षक अरविंद पवार, प्रदीप भोळे, पोस्ते पोतदार लर्न स्कूलच्या जगदेवी पोस्ते यांच्यासह क्रीडा क्षेत्रातील पुरस्कार प्राप्त प्रशिक्षक, खेळाडू यावेळी उपस्थित होते.

राज्यात क्रीडा संस्कृती रुजविण्यासाठी राज्य शासन काम करीत असून आंतरराष्ट्रीय खेळाडू घडण्यासाठी पुणे येथे आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठ स्थापन करण्याची कार्यवाही गतिमान करण्यात आली आहे. या विद्यापीठाच्या कुलगुरूपदी क्रीडा क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्ती नेमण्यास प्राधान्य दिले जाणार आहे. छत्रपती संभाजीनगर येथेही क्रीडा विद्यापीठ स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासाठी छत्रपती संभाजीनगर येथे नुकत्याच झालेल्या बैठकीत ६५६ कोटी रुपयांची घोषणा करण्यात आली आहे. राज्यात खेळाडूंच्या मदतीसाठी ऑलिम्पिक भवन स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याची माहिती ना. बनसोडे यांनी दिली.

आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये राज्यातील अनेक खेळाडू आपल्या देशाचे प्रतिनिधित्व करून लौकिक वाढवीत आहेत. सध्या चीनमध्ये सुरु असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेतही राज्यातील ६० पेक्षा अधिक खेळाडू सहभागी झाले आहेत. यापुढेही राज्यात आंतरराष्ट्रीय खेळाडू घडावेत, यासाठी प्रयत्न सुरु आहेत. राज्याच्या क्रीडा विभागामार्फत लक्षवेध योजनेंतर्गत विविध १२ क्रीडा प्रकारांच्या विकासावर भर देण्यात येणार आहे. 'खेलो इंडिया' अंतर्गत राज्यामध्ये जास्तीत जास्त क्रीडा अकादमी स्थापन करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत असून यासाठी केद्रीय क्रीडा मंत्री यांच्याकडे पाठपुरावा सुरु असल्याचे ना. बनसोडे यांनी सांगितले. तसेच पारंपारिक आदिवासी खेळांचा समावेशही क्रीडा प्रकारात करण्याचे प्रयत्न करण्यात येत असल्याची त्यांनी यावेळी नमूद केले.

गेल्या दोन महिन्यात क्रीडा विभागामार्फत अनेक महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आले असून विविध कारणांमुळे गेली तीन वर्षे रखडलेल्या क्रीडा पुरस्कारांचे वितरण करण्यात आले आहे. तसेच कुस्तीपटू स्व. खाशाबा जाधव यांचा जन्मदिवस १५ जानेवारी हा राज्य क्रीडा दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे णा. बनसोडे यांनी सांगितले.

लातूर जिल्ह्याला कुस्तीची उज्ज्वल परंपरा आहे. रुस्तम ए हिंद हरिश्र्चंद्र बिराजदार, अर्जुन पुरस्कारप्राप्त काका पवार यांच्यासह अनेकांनी जिल्ह्याचे नाव गाजविले आहे. जिल्ह्यातील नवोदित खेळाडूंना कुस्तीविषयी प्रोत्साहन देण्यासाठी लवकरच उदगीर येथे स्व. खाशाबा जाधव चषक कुस्ती स्पर्धा आणि राज्यस्तरीय फुटबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात येईल, असे ना. बनसोडे यांनी सांगितले.

उदगीर येथे खेळाडूंना अद्ययावत क्रीडा सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सुसज्ज क्रीडा संकुल उभारण्यासाठी प्रयत्नशील असून जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाने याबाबतचा प्रस्ताव तातडीने सादर करण्याच्या सूचनाही ना. बनसोडे यांनी दिल्या. उदगीर तालुक्यात विविध पायाभूत सुविधा निर्मिती आणि विकास कामांसह खेळाडूंकरिता क्रीडा क्षेत्राच्या विकासासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. यासाठी भरीव निधी उपलब्ध करून दिला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

मराठवाड्यात अनेक चांगले खेळाडू घडत आहेत. त्यांना प्रोत्साहन आणि पाठबळ मिळणे आवश्यक आहे. विविध क्रीडा स्पर्धांच्या आयोजनामुळे ग्रामीण भागातील खेळाडूंना प्रोत्साहन मिळेल, असा विश्र्वास अर्जुन पुरस्कारप्राप्त क्रीडा प्रशिक्षक काका पवार यांनी आपल्या मनोगतात व्यक्त केला.


जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लाकडे यांनी प्रास्ताविकामध्ये राज्यस्तरीय शालेली कुस्ती स्पर्धेची रूपरेषा आणि आयोजनामागील हेतू विषद केला.

प्रारंभी लातूर येथील देशिकेंद्रे विद्यालयाच्या चमूने मल्हार नृत्य आणि आदिवासी नृत्य सादर केले, तसेच उदगीर येथील श्यामलाल स्मारक विद्यालयाच्या चमूने 'ही मायभूमी, ही जन्मभूमी...' या गीतावर नृत्य सादर केले. सूत्रसंचालन अनिता येलमटे यांनी केले, उपस्थितांचे आभार उदगीरचे तालुका क्रीडा अधिकारी चंद्रकात लोदगेकर यांनी मानले. तालुका क्रीडा अधिकारी सारिका काळे, सुरेंद्र कराड, क्रीडा अधिकारी मदनलाल गायकवाड, दत्तात्रय गडपल्लेवार, कृष्णा केंद्रे, अभिजित मोरे, अमर मगर यावेळी उपस्थित होते.

उदगीर येथे २३ सप्टेंबर ते २५ सप्टेंबर दरम्यान होत असलेल्या राज्यस्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेत राज्यातील ८ विभागांमधून १४ वर्षांखालील विविध वजन गटातील १६० स्पर्धक सहभागी झाले आहेत. या स्पर्धेतील विजेत्या खेळाडूंची विदिशा येथे होणाऱ्या राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड होईल. स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व खेळाडूंना क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांनी शुभेच्छा दिल्या.

# १२६ वर्षांपूर्वी कॅनडात नव्हते शीख, आज तिथे भारतापेक्षाही जास्त शीख खासदार






मुंबई : खलिस्तानी दहशतवादी हरदीपसिंह निज्जर हत्येवरून भारत आणि कॅनडा यांच्यात तणाव निर्माण झाला आहे. खलिस्तानी दहशतवादी हरदीपसिंह निज्जरच्या हत्येबाबत कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन ट्रूडो यांच्या वक्तव्यामुळे दोन्ही देशांमध्ये तणावाची परिस्थिती निर्माण झाली आहे. दोन्ही देशांमधील राजनैतिक संबंध बिघडले आहेत. निज्जरच्या हत्येत भारतांचा हात असल्याचा आरोप कॅनडाचे पंतप्रधान टुडो यांनी केला. मात्र, भारताने ट्रुडो यांचे सर्व आरोप मोडीत काढत त्यांच्याकडे याबाबत पुरावे मागत चोथ प्रत्युत्तर दिलं आहे. या घटनेनंतर कॅनडामधील शीख स्थलांतरित चर्चेत आले आहेत. कॅनडामध्ये अनेक भारतीय वास्तव्यास आहेत. यासोबतच अनेक भारतीय विद्यार्थी कनडामध्ये शिक्षणही घेत आहेत. पण भारतीय कॅनडामध्ये पोहोचले कसे, हे सविस्तर जाणून घ्या.

१२६ वर्षांपूर्वीपर्यंत कॅनडात एकही शीख राहत नव्हता. १८९७ मध्ये पहिले शिख व्यक्ती कॅनडामध्ये गेले. १८९७ मध्ये ब्रिटीश भारतीय सैन्यातील रिसालदार मेजर केसर सिंग कॅनडामध्ये स्थायिक झाले तेव्हापासून शीखांचा कॅनडात प्रवेश सुरु झाला. त्यानंतर शीखांमध्ये कॅनडाचा प्रचार झाला आणि तेथे जाणाऱ्या शीखांची संख्याही वाढत गेली. १९८० पर्यंत शीखांची संख्या ३५ हजारांपर्यंत वाढली आणि त्यानंतर ही संख्या अनेक पटीने वाढून ७.७० लाखांच्या पुढे गेली.

मेजर केसुर सिंग हे कॅनडाला जाणारे पहिले शीख होते. १८९७ मध्ये राणी व्हिक्टोरियाच्या हिरक महोत्सव (ऊळरोपव गींलळ-श्रशश) पासून कॅनडामध्ये शीखांच्या आगमनाला सुरुवात झाली. मेजर केसुर सिंग हे कॅनडामध्ये स्थायिक झालेले पहिले शीख होते. १८९७ मध्ये राणी व्हिक्टोरियाच्या डायमंड ज्युबिली महोत्सवाच्या परेडसाठी ते पहिल्यांदा कॅनडाला गेले. ब्रिटीश भारतीय सैन्यातील रिसालदार मेजर केसुर सिंग २५ व्या कॅव्हलरी, फ्रंटियर फोर्समध्ये होते. राणी व्हिक्टोरियाच्या हिरक महोत्सव कार्यक्रमातील परेडमध्ये हाँगकाँग रेजिमेंटचा एक भाग म्हणून ते सहभागी झाले होते.

भारत आणि कॅनडा यांच्या लोकसंख्येच्या तुलनेनं कॅनडामध्ये भारतापेक्षा जास्त शीख लोकसंख्या आहे. भारतातील शीख लोकसंख्या एकूण लोकसंख्येच्या १.७ टक्के आहे, तर कॅनडात एकूण लोकसंख्येच्या २.१ टक्के शीख राहतात. इंग्रजी आणि फ्रेंच नंतर पंजाबी ही कॅनडाची तिसरी प्रमुख भाषा आहे.

सध्या भारतातील १३ लोकसभा खासदार शीख आहेत, तर कॅनडात शीख खासदारांची संख्या १५ आहे. पंतप्रधान जस्टिन ट्रूडो यांनी २०१६ मध्ये सांगितलं होतं की, त्यांच्या मंत्रिमंडळात पंतप्रधान मोदी यांच्या मंत्रिमंडळापेक्षा जास्त शीख मंत्री आहेत.

# शिक्षक हाच देशाचा खरा शिल्पकार-डॉ. सोमाणी

लातूर : शिक्षकांच्या कार्यातून अनेक पिढ्या घडविल्या जातात.शालेय जीवनापासून महाविद्यालयापर्यंत विद्यार्थ्यांना घडविण्याचे काम शिक्षकच करतात. यामुळे शिक्षक हेच देशाचे खरे शिल्पकार आहेत,असे मत रोटरी इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३१३२ चे माजी प्रांतपाल डॉ.हरिप्रसाद सोमाणी यांनी व्यक्त केले.

रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊनच्या वतीने दिल्या जाणाऱ्या रोटरी आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण सोहळयात डॉ.सोमाणी बोलत होते.शिक्षक आमदार विक्रम काळे व रोटरीचे सहाय्यक प्रांतपाल विशाल जैन यांच्यासह रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊनचे अध्यक्ष रवींद्र बनकर, सचिव अविनाश भोसले व किशोर दाताळ,लिटरसी डायरेक्टर ओमप्रकाश झुरळे व प्रोजेक्ट चेअरमन जगदीश कुलकर्णी यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.

यावेळी मार्गदर्शन करताना डॉ.सोमाणी यांनी पुराण काळापासून शिक्षकाचे असणारे महत्त्व विषद केले.रामायण व महाभारतातील गुरु आणि आजचे शिक्षक या दोघांचेही महत्त्व सारखेच असल्याचे ते म्हणाले. आ.विक्रम काळे यांनीही शिक्षकांच्या कार्याचा गौरव करून पुरस्कार प्राप्त शिक्षकांचे कौतुक केले.

या कार्यक्रमात तांत्रिक शिक्षण विभागातून डॉ. संतोष कुलकर्णी,वैद्यकीय विभागातून डॉ.नामदेव सूर्यवंशी,वरिष्ठ महाविद्यालय विभागातून डॉ.कोमल गोमारे आणि जिल्हा परिषद विभागातून महादेव खिचडे,शिवलिंग नागापुरे,वर्षा आगलावे, महादेव शिंदे व नागेश लोहारे यांना रोटरी क्लब क्लब ऑफ लातूर मिडटाऊनचा नेशन बिल्डर वार्ड २०२३ देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.

याच कार्यक्रमात इंट्रॅक्ट क्लब ऑफ यंग चिव्हर्सच्या पदाधिकाऱ्यांना चार्टर प्रदान करण्यात आला.इंट्रॅक्टच्या प्रेसिडेंट खुशी गांधी,सचिव यश देवणीकर,व्हाईस प्रेसिडेंट सायली हत्ते,कोषाध्यक्ष मानस बनकर,डायरेक्टर भाग्यश्री राघो यांच्यासह सदस्य मानसी माने, शांभवी सास्तुरकर,दीक्षा भातलवंडे,वृष्टी होनराव, सौम्या शाईवाले,सिद्धी रुद्रावार,उमंग पोकर्णा, राही कुलकर्णी,रुद्राक्ष उटगे,वीरेश सावंत, आदित्य रेवडकर,महेक अग्रवाल,वर्षा सलगर,सृजन बंडे,कैवल्य शेटे यांना चार्टर प्रदान करण्यात आला.

प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले.

रवींद्र बनकर,ओमप्रकाश झुरळे,अविनाश भोसले यांनी उपस्थितांचे स्वागत केले. प्रा.झुरळे यांनी प्रास्ताविक केले.अमोल दाडगे,श्रवण बियाणी,मन्मथप्पा पंचाक्षरी यांनी उपस्थितांचा परिचय करून दिला.रवींद्र बनकर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

या कार्यक्रमास रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊनचे पदाधिकारी, सदस्य,शिक्षक व नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

रोट्रॅक्ट क्लब ऑफ लातूर मिडटाऊनच्या वतीने गणेशोत्सव सुरू होत असताना गणेश मूर्ती तयार करण्याची कार्यशाळा घेण्यात आली होती.या कार्यशाळेसाठी ३५०जणांनी नोंदणी केली त्यापैकी २५० जणांना रोट्रॅक्ट क्लब ऑफ लातूर मिडटाऊनच्या वतीने प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षण देणाऱ्या सदस्यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला.

# मानवी कल्याणासाठी विज्ञान आणि तंत्रज्ञान आवश्यक-डॉ. संजय गवई

लातूर : आजच्या धकाधकीच्या जीवनामध्ये मानवी कल्यानाची संकल्पना अत्यंत महत्त्वाची आहे. मानवाच्या कल्याणासाठी प्रगत विज्ञान आणि तंत्रज्ञानाची नितांत आवश्यकता असते त्यामुळेच आपले जीवन हे सुखी, समाधानी आणि समृद्ध बनू शकते असे प्रतिपादन महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी केले.

शिक्षणाधिकारी (माध्यमिक) कार्यालय, जिल्हा परिषद, लातूर आणि महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालय, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने मानवी कल्याणासाठी विज्ञान आणि तंत्रज्ञान नाट्य महोत्सव महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहात संपन्न झाला यावेळी उद्घाटक म्हणून बोलत होते.

यावेळी विचारमंचावर लातूर उपशिक्षणाधिकारी निरीक्षक बालवाड, उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे, उपप्राचार्य प्रा. संजय पवार, पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे आणि परीक्षक प्रा. विश्र्वनाथ स्वामी, यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी जगतज्योती महात्मा बसवेश्र्वरांच्या प्रतिमेला उपस्थित मान्यवरांनी अभिवादन केले.

पुढे बोलताना प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई म्हणाले की, आपण लहान मुलांचे अभिनय कौशल्य पाहून मुलांमध्ये नेहमीच आनंद शोधण्याचा प्रयत्न केला पाहिजे. मुलांचे हास्य पाहून आपले जीवन सार्थक होत असते.

यावेळी उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे म्हणाले की, नाट्य महोत्सवाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील विशेषत: जिल्हा परिषद शाळेमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांमधील कला गुणांना वाव मिळतो त्यासाठीच हा नाट्य महोत्सव शासन साजरा करीत असल्याचे सांगून पश्र्चिमात्य नाट्य संस्कृतीची माहिती दिली.

यावेळी लातूर जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातून प्रथम आलेल्या शाळांचा जिल्हास्तरीय राष्ट्रीय विज्ञान महोत्सवामध्ये समावेश होता. लातूर जिल्ह्यातील नऊ तालुक्यातील नऊ संघ सहभागी झाले होते. या महोत्सवामध्ये प्रथम क्रमांकाचे प्रथम पारितोषिक रु. १५०० श्री मारवाडी राजस्थान विद्यालय, लातूर यांना तर द्वितीय पारितोषिक रु. १००० जगत जागृती विद्यालय, चाकूर आणि तृतीय पारितोषिक रु. ५०० श्रीराम विद्यालय, रेणापूर या संघाला मिळाले. या स्पर्धेचे परीक्षक म्हणून प्रा. विश्र्वनाथ स्वामी, प्रा. लक्ष्मण श्रीमंगले आणि राम येदले यांनी काम पाहिले. या जिल्हास्तरीय स्पर्धेनंतर लातूर, नांदेड आणि उस्मानाबाद या जिल्ह्यातून प्रत्येकी एक विजयी संघाची विभागीय स्पर्धा महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहात संपन्न होणार आहे.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे आणि प्रा. किसनाथ कुडके यांनी केले तर आभार प्रा. विश्र्वनाथ स्वामी यांनी मानले.

या कार्यक्रमाला कृष्णा कोळी, बालाजी डावकरे आणि आनंद खोपे यांनी बहुमोल सहकार्य केले.

या महोत्सवाला लातूर जिल्ह्यातील नऊ तालुक्यातील कलाकार विद्यार्थ्यांसोबत पालक आणि शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जावक क्रमांक २३९९/२०२३
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, लातूर
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, लातूर, २ रा मजला, दिवाणजी कॉम्पलेक्स, अंबाजोगाई रोड, लातूर.
२१ सप्टेबर २०२३

### चौकशीची जाहीर नोटीस

एस.आर. एन. क्रमांक LTR/03131/18/23
फेरफार अहवाल/ अर्ज क्रमांक :____________
सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक माणुसकी प्रतिष्ठान लातूर ता. जि. लातूर बाबत ।
न्यासाचा पत्ताः- होळकर नगर, शाहु चौक, लातूर
अर्जदार :- रवि विश्वनाथ गायकवाड

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त, लातूर, हे वर नमुद केलेला अर्ज या संबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेतः-

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

**जंगम मिळकत (वर्णन)**

| अ. क्र. | तपशील | अंदाजे मूल्य |
|---|---|---|
| १. | PRESIDENT IN HAND | १०००.०० |
| २. | MEMBER FEE | ५०००.०० |

(अ) जंगम मिळकत :- रोख रू. ६०००/- मात्र
(अक्षरी रूपये सहा हजार मात्र फक्त)

**स्थावर मिळकत (वर्णन)**

| अ. क्र. | शहर किंवा गाव | सी. एस. किंवा महानगरपालिका किंवा सर्वेक्षण क्र. | क्षेत्र | मूल्यांकन | मुदत/ कालावधी किंवा स्वरूप | अंदाजे मूल्य |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

(ब) स्थावर मिळकत :- रोख रू. /- मात्र
(अक्षरी रूपये मात्र फक्त)

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतींचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफीयत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनियशी व या कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक २०-०९-२०२३ रोजी दिली.

शिक्का

स्वाक्षरीत/-
प्र. अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, लातूर

छोटी झेरॉक्स मशीन व प्रिंटर विक्री
कलर प्रिंट/झेरॉक्स
B/W प्रिंट/झेरॉक्स
जम्बो झेरॉक्स/प्रिंट
डिझाईनिंग/पासपोर्ट फोटो
रिफीलींग/टोनर/फोटो पेपर
लॅमिनेशन मशिन व मटेरिअल
झेरॉक्स मशीनचे अधिकृत विक्रेते :
बोरा झेरॉक्स
व्यापारी धर्मशाळा, महात्मा गांधी चौक, लातूर.
9673344777

श्री.तिरूपती ट्रेडींग कंपनी
शिवाजी चौक, निलंगा, जि. लातूर
जैन ठिबक सिंचन
जैन स्प्रिंकलर
जैन पी.व्ही.सी.पाईपचे
-: अधिकृत विक्रेते:-
प्रो. गुणवंत गायकवाड हलगरकर
फोन:-दु. २४२४६३, मो.९४०४६८२९९९



SINCE 1972
माळवदकर एजन्सीज
सावेवाडी, लातूर
mo. 9422656522
सर्व प्रकारच्या फर्निचरचे उत्पादक व विक्रेते